वरील ओळीवरुन बापाची उदारमनस्क वृत्ती प्रतीत होते जन्मदाता हा सद्गुणांची खाण असल्याचा निर्वाळा देताना कवीने चारचौघात कसं वागावं, माणुसकीनं माणसं कशी जोडावी ही उपजत कला बापामध्ये असल्याचा आनंद “सद्गुणी बाप” (पृ.२५) मध्ये व्यक्त केला आहे.

बापाच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडताना खंबीर व पुरोगामी विचाराचा बाप कवीने रेखाटला आहे. कन्यादान करताना सर्वत्र रडारड सुरु असताना बाप मात्र काळजावर दगड ठेवून कर्तव्य बजावतो. आतून मूक रुदन करणारा बाप अश्रू थांबवण्याचे अवघड कार्य पार पाडतो. हे भावनिक प्रसंग कवी खालील प्रमाणे रेखाटतो.

“मुलीच्या लग्न-समारंभवेळी / किती अन् कसा कठोर
डोळ्यातून बाहेर पडणारे अश्रू / बाप निश्चयानेच रोखून

धरतोश. (पृ.३०)

याचा अर्थ असा होत नाही की बाप रडत नाही. बाप निरक्षर, अंगठेबहाद्दर असला तरी शिक्षणविषयक दूरदृष्टी बापामध्ये आहे याची अनुभूती ष्बापाची श्र ालगंगाष (पृ.२६) मधून येते. भविष्य हे मनगटाच्या बळावर घडते ज्योतिषशास्त्रावर विसंबून राहून नाही हे आधुनिक विचार जोपासणारा बाप कवितेतून रेखाटताना कवी म्हणतो की,

श्बाप पुरोगामी विचारांचा, ज्योतिष्यापुढं नाही धरत हात
त्याच हातची कष्टे सारी, केली दारिद्र्यावर मात्र (पृ.२२)

आगळी-वेगळी ष्बापाची खंतष ही प्रस्तुत कवितेत कवी रेखाटतो. सीमेवर शहीद झालेल्या सुपुत्राचा वियोग बापाला सतावतो आहे. परंतु आणखी एखादा मुलगा असता तर तोही देशाच्या रक्षणासाठी पाठवता आला असता हे शल्यही त्याच्या मनाला बोचत राहते. हे सांगताना कवी म्हणतो की,

श्आता राहून राहून / एक खंत ती बापाला
नाही एक का अजून / त्यांक देशरक्षणालाश (पृ.३८)

ज्या बापाच्या देशप्रेमासमोर मुलाचा विरह तोकडा पडावा खरच अशा बा समोर वाचकाला नतमस्तक व्हावसं वाटत नाही. बापाला अनेक संकटांना, प्रसंगांना समोरे जाताना वेदना होत नाहीत असे नाही परंतु त्या वेदना बापाला पराभूत करू शकत नाही असा ठाम विश्वास कवी ष्बापाची वेदनाष मध्ये व्यक्त करतो तो पुढीलप्रमाणे

श्बाप नेहमीच सुखात / वेदनाच नित्य करे
होवो कितीही वेदना तीव्र / वेदनेवेच होईल हसेश (पृ.३६)

वेदना ही सदैव बापाच्या सभोवताल फिरते पण बापाला पराजित करू शकत नाही. अर्थात बापाच्या कणखरपणामुळेच. या संग्रहातील काही कवितांमध्ये बापाला एकाचवेळी ष्दारिद्र्यदेवीष्एव्होशिदाष,ष्अवलियाष,ष्तीर्थरूपष,ष्कष्टकरीष,ष्कुटुंबवत्सल भूमिका जगाव्या लागतात याचे प्रतिबिंब उमटले आहे.

मुलाबाळांसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवणाऱ्या बापाविषयी कृतज्ञ रहा म्हणून कवी ष्बाप-संगतष या कवितेव्दारे संदेश देतो की,

श्बापाच्या उतारवयात कोणी, खुपसू नका पाठीत खंजीर
त्याला नको असतो पैसा-पाणी, बाप प्रेमासाठी असतो
अधीरश (पृ.२४)

वरील ओळींच्या माध्यमातून कवी नवपिढीने बापाला अंतर देऊ नये ही विनवणी करतो. ही गरज का भासते आहे त्याचे कारणही कवीने ष्बाप अन् आम्हीष या कवितेव्दारे स्पष्ट केले आहे. बापानं बाप म्हणून जबाबदारी पार पाडली परंतु मुलगा म्हणूनही आपल्या आई-वडीलाप्रति कर्तव्याची जाणीव ठेवली. आताच्या पिढीमध्ये मात्र बापाच्या उपकारांची जाणीव नाही अशा महाशयांचा समाचार घेताना कवी म्हणतो की,

श्असे कसे महाशय काही / असती नुसतेच वाचाळ
माय-बाप ज्यास कळले नाही / ते धरतीवरच या नाठाळश
(पृ.४८)

अशा नाठाळांच्या डोळ्यात अंजन घालता येईल असे काही प्रसंग कवीने रेखाटले आहेत. ष्बापाच्या नावासाठीष (पृ.२८) प्रयत्न करू त्याचा अवमान होणार नाही याची काळजी घेऊ असे आवाहन कवीने केले आहेच शिवाय ष्जन्मोजन्मीष (पृ.३७) हाच बाप मिळावा हे ष्साकडेष (पृ.५३) सुध्दा घातले आहे. प्रत्येक जन्मात हाच बाप मिळावा ही आर्तता व्यक्त करताना कवीने अप्रत्यक्षरित्या आजच्या पिढीला एक संदेश दिला आहे की, किमान या जन्मात तरी तरुणांनी बापाला जीव लावावा, बाप म्हणून त्याची पुजा राखावी.

थोडक्यात,ष्बापासाठी लिहितानाष (पृ.५२) लिहिले होणारा कवी ष्बाप नावाचं माहात्म्यष (पृ.५४) गाताना प्रत्येक मुलाला भूतकाळात घेऊन जातो आणि ष्पितृत्वष (पृ.५५) हे खऱ्या अर्थानं घरा-दाराचं नेतृत्व आहे हे वाचकांच्या मनी ठसवतो.

संदर्भ :-

१. बाप आणि पितृत्व, रवि वर्षा सोनार, मिलन प्रकाशन, सोलापूर
२. ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा, डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद
३. ग्रामीण साहित्य बदलते संदर्भ, शेषराव मोहिते, मराठा प्रकाशन, औरंगाबाद

०००



MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
March 2018
Special Issue-04
061

परिस्थितीनुसार अनेक आक्रमणे तिने आपल्या सामर्थ्याने झेलली, परतवून लावली आणि अधिक तेजस्वी झाली. ख्रिस्ती कवी फादर स्टिफन्स यांनी केलेल्या मराठी भाषेच्या वर्णनानुसार

"जैसे पुण्यामाजि । पुण्य मोगरी ।
तैसे भाषांमाजी । साजरी मराठी ।।

काळाची, परिस्थितीची, विविध राजवटींची आव्हाने पचवीत मराठीचा सुगंध आसमंतात दरवळत राहिला.

आज जागतिकीकरणाच्या युगात मायमराठीचे अस्तित्व आणि अस्मिता कायम अबाधित कसी राहील. आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर 'मराठी भाषेचे जागतिकीकरण' कसे होईल, यासाठी प्रयत्नशील राहणे, प्रत्येक मराठी भाषिकाचे कर्तव्य ठरते. बदलत्या काळातील स्थित्यंतरांना, आव्हानांना आत्मसात करीत पुढे जाणाऱ्या, महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून निनादणाऱ्या व प्राचीन काळापासून तेजस्वी वाङ्मय वैभव असलेल्या मराठीचा भविष्यकाळ सुध्दा निश्चितच ओजस्वी असेल.

संदर्भ ग्रंथ :-

१) जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनुभव
- सी.पं.खेर
२) जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने
- प्रा.जगन कराडे
३) जागतिकीकरण आणि मराठी भाषा
- संपा.डॉ. अजमेरा, प्रा. उपर्वट
४) भाषा आणि संस्कृती - ना.गो.कालेलकर
५) मराठीचा भाषिक अभ्यास - डॉ.ग.ना.जोगळेकर

❑❑❑

16

मराठी भाषा आणि जागतिकीकरणाचे आव्हान

श्री. मधुकर बालासाहेब जाधव,
सहायक प्राध्यापक,
मराठी विभाग,
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा, जि. बुलडाणा (महाराष्ट्र)

एखाद्या गोष्टीचा, तत्त्वाचा स्वीकार करणे या पेक्षा त्यांची प्रतीती येणे हे अधिक चांगले कारण अनुभवाद्वारे ते चांगल्या प्रकारे समजून घेता येते. आपल्यातील विचारसामर्थ्य हे मातृभाषेतून प्रभावीपणे व खऱ्या अर्थाने विकसित होते, म्हणून मिळणारे ज्ञान हे जर मातृभाषेत असेल तर ते चांगल्या प्रकारे समजून घेता येते.

जागतिकीकरण ही एक महत्त्वपूर्ण व दखलपात्र घटना आहे. जागतिकीकरणाचा सर्वच गोष्टींवर कमी–अधिक प्रमाणात प्रभाव दिसून येतो. जागतिकीकरणाच्या आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक परिणामाविषयी उहापोह अनेक साहित्यिकांनी, अभ्यासकांनी केला आहे. विवेक, स्वातंत्र्य , समता या प्रशोषनाच्या मूल्यांची बाजू घेऊन जागतिकीकरणाला विरोध करणारे, शोषणाच्या विरोधात निश्चित अशी नैतिक भूमिका घेणारे लेखन अधिक प्रमाणात अपेक्षित आहे.

वसंत पाटणकरांच्या मताप्रमाणे नोकरी–व्यवसायातील असुरक्षितता आपल्या संस्कृतीची, सांस्कृतिक अस्मितेची, सांस्कृतिक अराजकाची चिंता, आपल्या भाषेच्या अस्तित्वाची चिंता, संवादाच्या लोपाची चिंता, संवेदनशीलतेच्या लोपाची चिंता या जागतिकीकरणामुळे उद्भवलेल्या समस्या आहेत. यामध्ये जागतिकीकरणामुळे आपल्या भाषेची होणारी गळचेपी व त्यामुळे संवादामध्ये येऊ पाहणारे अडथळे अस्वस्थ करणारे आहेत.



MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
March 2018
Special Issue-04

जागतिकीकरणाच्या अतिक्रमणाअगोदर मराठी भाषेला समृद्धी मिळवून देण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न झालेले दिसून येतात प्राचीन काळापासून तर आधुनिक कालखंडापर्यंत भाषेचे अनेक चढउतार पाहिले आहेत ते खालीलप्रमाणे पाहता येतात.

समाजव्यवहाराचे साधन असलेली मराठी भाषा ही स्वयंसिध्द आहे. हा आत्मविश्वास मराठीला मराठी समाजाच्या विशिष्ट परंपरेपासून व इतिहासापासून मिळालेला आहे. महाराष्ट्रीयत्वाच्या अभिमानाचे बाळकडू तिला आरंभापासूनच मिळाल्याचे लक्षात येते.

साडी लक्ष देश महाराष्ट्र ।
तेथिचे शिष्टांणे सुभट्ट ।।
वेदशास्त्रचातुर्यांची पेठ ।
भरली तिये देशी ।।
ऐसे ते महाराष्ट्रराये सुंदरु ।
तरी महाराष्ट्रभाषा नतुरू
तेही वसविले गंगातीरु ।
क्षेत्र स्थैर्यकू वेल्ही ।।

महानुभावांचा हा अभिमान शतके लोटली तरी मराठी अविच्छिन्नपणे वागवीत आली आहे.

श्रीचक्रधरस्वामी, संत ज्ञानेश्वर यांनी प्राकृत भाषेला अर्थात मराठीला न्याय देण्याचा प्रयत्न केला. संत एकनाथ महाराजांनी संस्कृत देवे केली मग प्राकृत काय चोरापासून झाली असा मार्मिक सवाल उपस्थित करून मराठी भाषेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

१८७० नंतर सावरकर, पटवर्धन यांनीही भाषाशुद्धीची चळवळ चालवून भाषेत फक्त देशी शब्दांचाच वापर व्हावा असा आग्रह धरला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी याबाबत आग्रह धरताना लोकभाषा ही ज्ञानभाषा व्हायी तरच ज्ञान सर्वसामान्यापर्यंत पोहचेल असे मत मांडले. सर्वसामान्य बहुजन वर्ग कित्येक वर्ष ज्ञानापासून दूर राहिला कारण प्राचीन काळी ऋषीमुनींद्वारे ज्ञान दिले जाई. यासाठी भाषा होती संस्कृत व बोलीभाषा प्राकृत यामुळे सर्वसामान्य जनता ज्ञान मिळवण्यापासून वंचित राहिली. कालांतराने परकीय आक्रमणामुळे व वर्चस्वामुळे ज्ञानभाषा म्हणून अरबी , फारशी, उर्दू, यांचा वापर झाला, परिणामी जनता ज्ञान मिळवण्यापासून दूर राहिली. इंग्रजांचा अंमल देशावर प्रस्थापित झाल्यानंतर कारकून तयार करण्याच्या प्रमुख उद्देशाने त्यांनी भारतीयांना शिक्षण देणे सुरु केलेय भाषा होती इंग्रजी. दीर्घकाळ बहुजनांची भाषा ज्ञानभाषा बनू शकली नाही परिणामी ज्ञानग्रहण करता आले नाही. आजही वैद्यकीय, अभियांत्रिकी व काही पदवी शिक्षण असे आहे की, ते इंग्रजीतूनच घ्यावे लागते. भाषेबाबतच्या न्यूनगंडामुळे काही विद्यार्थी या क्षेत्राकडे वळत नाहीत. या समस्येवर मात करण्यासाठी उच्च शिक्षण हे मातृभाषेतून दिल्याशिवाय पर्याय नाही.

अशा प्रकारे जागतिकीकरणापूर्वी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कळाच्या अनेक उप्यायमध्ये प्रयत्न झाले. १९९० नंतर जागतिकीकरणाने बहुतांश बाबी प्रभावित झाल्या यामध्ये भाषांचाही समावेश होतो. या रेट्यात मराठी भाषा हरवू नये यासाठी काय करता येईल यावर बरीच खल झाला अजूनही होतो आहे. सद्यस्थितीत जागतिक मराठी भाषा दिन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अशा उपक्रमांच्या माध्यमातून भाषा जगविण्याचे व तिला माझा मराठाचि बोलू कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके हे गतवैभव प्राप्त करून देण्याची धडपड सुरु आहे.

काळाची गरज म्हणून अनेक पालक आपल्या पाल्याना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाठवतात, अर्थात तो ज्याचा त्याचा वैयक्तिक निर्णय आहे यामध्ये ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही. परंतु त्या मुलांचे मातृभाषेकडे होत असलेले दुर्लक्ष, भाषा आवडीने समजून घेण्याबाबतची उदासिनता व हे निवारण्यासंदर्भात पालकांमधील अनास्था क्लेशदायक आहे. एखाद्या लहान मुलाला चर्चेत लिहून दाखव म्हटले की तो लगेच लिहितो हे जागतिकीकरणाच्या विचार करता तारक आहे परंतु त्याला तेरा हा अंक लिहायला सांगितले की तो केविलवाण्या नजरेने आपल्याकडे पाहतो हे मात्र मातृभाषेसाठी मारक आहे. यासाठी पालकांना दोषी धरू नये तर काय निरागस बालकांना दोष द्यावा ? प्रत्येक पालकाने मुलांना मराठीबाबत आवड निर्माण होईल, ही केवळ बोलण्याची नव्हे तर आपल्या अस्मितेची भाषा आहे ही जाणीव होईल यासाठी आवर्जून प्रयत्न करावेत.



MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® March 2018 Special Issue-04 063

मराठी ही भाषा मुळातच लवचिकही. तिने इतर भाषेतील अनेक शब्द स्वतःमध्ये सामावून घेतले आहेत. परकीय भाषेतील काही शब्द मराठीमध्ये इतके स्थिरावले आहेत की शिशा हा शब्द आपण वापरतो तो जपानी भाषेतील आहे याचे आश्चर्य वाटते. रुमाल, बटाटा हे शब्द पोर्तुगीज भाषेतील आहेत यावर आपला विश्वास बसेल का ?. दलाल, खेडूत हे मूळ मराठी शब्द नसून गुजराती भाषेतील आहेत. अक्का, अडकित्ता हे पाहुणे कानडी भाषेतून मराठीत आले आहेत ही वस्तुस्थिती लक्षात घेता मराठी किती संमिश्र व बहुआयामी आहे याची प्रचिती येते. याव्यतिरिक्त अनेक भाषेतील विविध शब्द मराठीने आपलेसे केले आहेत. जागतिकीकरणाच्या बाबतीतही असाच काहीसा मार्ग विषणे अपेक्षित आहे.

जिवंतपणे आईला ममी व बाबाला डेड करणारे शब्द जर आपण सर्रासपणे वापरू लागलो तर भाषेला मरगळ येणार नाही तर काय येईल? अशा प्रश्नांवर चिंतन व्हायला हवे. मराठी भाषेला नवसंजीवनी प्राप्त व्हावी यासाठी प्रयत्न व्हावे. अंतर्गत यादवी, कौटुंबिक कलह ज्याप्रमाणे आपापसात द्वेष निर्माण करतो, आप्तेष्टांचीच प्रगती खुंटवितो. त्याप्रमाणे मराठीतील बोलीभाषा बोलणारा एक समूह दुस–या समूहाची टिंगलटवाळी करतो.

अहिराणी बोलणारा व–हाडी बोलणा–याची नक्कल करून टर उडवतो. व–हाडी बोली बोलणा–याला अहिराणी चमत्कारिक वाटते. एकमेकांवर कुरघोडी करण्याचा, आमचीच भाषा सरस असा अहंभाव बाळगण्याचा हा पोरखेळ थांबवयास हवा. परस्परांच्या बोलीचा आदर करणे, आस्वाद घेणे हा समजूतदारपणा दाखवावयास हवा तेव्हाच जागतिकीकरणाचा सामना करता येईल.

मराठी भाषेची उज्ज्वल संस्कृती सुदृढ करण्यासाठी काही ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे. भारतातील भाषिक राज्यांच्या द्वारे फुटिरपणाची वृत्ती कदाचित जोर धरु शकते. भाषिक भेदातून नवा संघर्ष निर्माण होऊ शकतो हा संभव लक्षात घेऊन मराठीने भारतातील इतर भाषांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न अधिक जोरकसपणे करायला हवा. नवा दृष्टीकोन स्विकारायला हवा . शिक्षण, विज्ञान, तंत्र, प्रशासन यातील भारतीय एकरूपतेची आवश्यकता ध्यानात घेऊन नवीन एकरूप पर्याय मराठीने आपले म्हणजे त्यांना आपल्या शब्दसंग्रहात स्थान देणे गरजेचे आहे. यामुळे मराठी भाषेचे स्वातंत्र्य जाहीरसे होणार नसुन तिला एक विशाल अर्थ प्राप्त होईल यामुळे मराठी भाषा अनेक अंगाने विकसित होईल, हर एक क्षेत्रातील गरजा भागवण्यास ती समर्थ ठरेल, तिची अभिव्यक्षमता वाढेल तेव्हा ही विकसनशील भाषा अभिमानाचा विषय होऊ शकेल. आणि जागतिकीकरणाचे अतिक्रमण परतवून लावू शकेल.

संदर्भ :

१) पाटणकर वसंत, जागतिकीकरण आणि मराठी कविता, परिवर्तनाचा वाटसरु, जून २०१४

२) भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, शासनव्यवहारात मराठी : समस्या, स्वरुप प्रक्रिया

३) भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंथन, राजभाषा वर्षातील वैचारिक लेखांचे संकलन

❑❑❑



403

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

२७. राष्ट्रसंत तुकडोजींची शिकवण : संस्कारक्षम ठेवा

प्रा. मधुकर जाधव
मराठी विभाग, श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा.

प्रास्ताविक

भारतातील भगवद्गीतेच्या अधिष्ठानावर नवभारताचील यानगीतेचा दिव्य संदेश देणाऱ्या, सामान्यांना महान बनविण्याचाच्ये कवित्वाची कृतार्थता मानणाऱ्या महाकवीचा म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी उपाख्य माणिक बंडोजी ठाकूर यांचा जन्म यावली या गावी एका गरीब कुटुंबात झाला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून राष्ट्रसंत नावारूपास आले व राष्ट्रधर्माचे चालते बोलते मूर्त स्वरूप व प्रबोधनाचे मंदादीप म्हणून विख्यात पावले.

राष्ट्रसंतांची शिकवण

सद्गुरु आडकोजी महाराजांच्या मंगलमय आशीर्वादाने सदैव विश्वात सूर्यतेजाप्रमाणे तळपणा-या दुःखितांना चंद्रतेजासमान शीतलता देणाऱ्या, गंगेप्रमाणे राष्ट्राला नवजीवन देऊ पाहणाऱ्या युवा पिढीला मोलाची शिकवण देण्याचे पवर्य राष्ट्रसंतांनी अतिशय समर्थपणे पार पाडले आहे. संस्कारक्षम ठेवा असलेल्या महाराजांच्या शिकवणीचे महत्व खालील विवेचनावरून लक्षात येईल.

माणुसकी जपा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात माणुसकी रक्तबंबाळ झालेली आहे. अशा अवस्थेत मानवतेच्या कल्याणासाठी खरा माणूस जागविण्याची वेळ आली आहे. हाडामासाचा माणसासारखा दिसणारा माणूस तुकडोजींना अपेक्षित नाही तर सरळ हृदयाचा सेवाभावी वृतीचा परिश्रमी प्रवृतीचा सर्वांवर प्रेम करणारा अस्मितापूर्ण माणूस त्यांना अपेक्षित आहे. विदर्भ साहित्य संघाच्या व्यासपीठावरून महाराजांनी काढलेले उद्गार माणूस या संज्ञेचे मर्म स्पष्ट करणारे आहे–

"मी बोलून चालून अनपढ मानूस मला तुमचे आधुनिक वाद समजत नाहीत मला फक्त एकच कळते ते हे की प्रत्येक मनुष्यात परमेश्वर आहे आणि त्या परमेश्वराला जागे करणे आणि त्याची सेवा करणे हाच खरा धर्म आहे हा मानवतेचा उपासना धर्म तेवढा मला कळतो."

मृतप्राय झालेल्या राष्ट्राला आणि अधःपतित झालेल्या समाजाला पुन्हा संजीवनी प्राप्त करून द्यावयी असेल तर या हाडामासाच्या सांगाड्याने आता अंतर्मुख होऊन माणूस बनण्याचा प्रयत्न करावा व माणुसकी जोपासावी ही शिकवण राष्ट्रसंत देतात.

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

४०६

देशालाच देव माना

देशालाच देव मानून त्याची सेवा करा सर्वांमध्ये देशाप्रती समन्वयाची भावना निर्माण व्हावी यासाठी सामुदायिक प्रार्थना व्हावी. जातिवाद, सांप्रदायिक वाद यांच्या विळख्यातून बाहेर पडून देशाच्या विकासासाठी समोर आले पाहिजे राष्ट्रसंतांचा जगणे मरणे राष्ट्राकरिता हा बहुमोल संदेश हृदयात कोरून ठेवण्यायोग्य नक्कीच आहे. देवभक्तीतून देशभक्ती व देशभक्तीतून विश्वव्यापी वृत्ती हाच मानवाचा विकासमार्ग महाराज पटवून देतात विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी स्वतःला राष्ट्रीय कार्यात वाहून घ्यावे. सुराज्याचे स्वप्न पाहणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की समाजपरिवर्तनाचे जनजागृतीचे कार्य साधण्यासाठी व्यक्ती, कुटुंब, समाज, ग्राम, देश, विश्व या मार्गाचा अवलंब करावा. देश आपल्या स्वाँच्या हक्कावर उभा असतो असे सांगून देश आधी व देव नंतर असा मूलमंत्र ते देशवासीयांना देतात. देशाला जगविण्याची, जागविण्याची, जोपासण्याची, त्याची भरभराट करण्याची प्रेरणा प्रत्येक भारतीयांमध्ये जागविल्या गेली पाहिजे असे त्यांना वाटते. राष्ट्रसंत केवळ उपदेशक नव्हते तर त्यांनी आपल्या विचारप्रणालीप्रमाणे आचारही केला व विचार आणि आचार यांच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी फार मोठी सेवा केली हे नेत्रदीपक कार्य निश्चितच पथदर्शक ठरते.

सर्वधर्मसमभाव बाळगा

प्राचीन वाङ्मयातील संतांच्या साहित्यामध्ये धर्मविषयक विवेचन करताना त्यांनी कवित्व रसिकत्व आणि परतत्त्व यांचा सुरेख संगम घडवून आणलेला दिसतो. विसाव्या शतकात राष्ट्रसंतांचे गद्यपद्य वाङ्मय निर्माण झाले. तुकडोजी महाराजांच्या शब्दाशब्दातून मानव धर्म, राष्ट्र धर्म आणि विश्वधर्म यांचाच वापर होताना आढळतो सद्विचार व सद्प्रवृत्ती लोकांच्या मनावर बिंबविण्याचे कार्य तुकडोजी करतात अर्थात परधर्माप्रति सहिष्णुता असावी हाच बोध आपणास त्यांच्या साहित्यकृतीमधून मिळतो. प्रत्येक धर्म मानवाला एकमेकांचे मित्र बनून राहायला विश्वमित्र बनायला सांगतो. प्रत्येक धर्मानुसार देवाची नावे वेगवेगळी असली तरी देव मात्र एकच आहे. ज्याप्रमाणे समुद्रातील पाण्याच्या असंख्य थेंबांची वाफ होऊन शेवटी आकाशात एकाच ठिकाणी पाणी होऊन मिळते त्याचप्रमाणे कोणत्याही धर्मानुसार केलेली ईश्वरोपासना शेवटी एकाच मोक्षाप्रति घेऊन जाते त्यासाठी सामुदायिक प्रार्थना करण्याचे आवाहन तुकडोजी करतात.

चांगुलपणात तारतम्य ठेवा

राष्ट्रसंत ग्रामगीतेतील ग्रामनिर्माण पंचक अंतर्गत येणाऱ्या ग्रामरक्षण अध्यायामध्ये सात्विकता व चांगुलपणाबद्दल सावध पवित्रा घ्यायला सांगतात. सात्विक विचारसरणी असावी पण त्यामध्ये दौर्बल्य नसावे कोणाला कोणती सेवा द्यावी हे स्वतः समजले पाहिजे. परोपकारी वृत्ती प्रत्येकाच्या मनात असावी ती उणीव आपणामध्ये राहू नये परंतु, जेथे निर्दयपणा गरजेचा आहे तेथे दगडापेक्षा ही कठीण व्हावे. ज्या दयेमुळे व्यक्तीला बाधा होत असेल,

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

407

गावाला धोका पोहोचत असेल ती दया नाही असे समजावे. एकाने आपले कार्य प्रामाणिक ठेवून आपला आहार पोषक आणि सात्त्विक ठेवावा व आळस आणि विकाराला दूर ठकलावे जीवनामध्ये संयम ठाकून दया धर्म दानधर्म याचे वर्म जाणून आपली वागणूक ठेवावी हाच चांगुलपणा होय. हि राष्ट्रसंतांची दूरदृष्टी महत्त्वाची वाटते.

स्वावलंबी व उद्योगप्रिय बना

जीवनामध्ये कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करावयाचे असेल तर त्यासाठी आयुष्यात परिश्रमाची, अविरत उद्योगाची नितांत आवश्यकता असते या दुनियेमध्ये अनेकदा रावाचे रंक आणि रंकाचे राव झालेले आपण पाहतो. सदैव आपल्या उद्योगात व्यग्र असणारी व्यक्तीच सहज सफल होऊ शकते. आपल्या परिश्रमाच्या पाठबळावर अशी व्यक्ती प्रगतीच्या शिखरावर पोहोचू शकते राष्ट्रसंत स्वयंसंबीत्वाच्या संदर्भात युवा पिढीला संदेश देतात की स्वावलंबनाची कला प्रत्येकामध्ये अंगभूत असावी हि कला शक्तिसामर्थ्य व बुद्धिचातुर्याने गतिमान करण्याचा प्रयत्न करावा. शहराकडे धाव न घेता खेड्यांमध्ये आपला उद्योग उभारावा व सतत कार्यमग्न राहावे कारण उद्योगी माणसाचे जीवन सुख समृद्धीने बहरून येते. आनंदाने फुलते. जी गोष्ट व्यक्तीची तीच राष्ट्राची आहे. आज उद्योगप्रधान राष्ट्रे उत्कर्षाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेली आहेत.

या व अनेक बाबतीत यश संपादन करण्यासाठी राष्ट्रसंतांची शिकवण अंगीकारणे व राबविणे गरजेचे आहे.

संदर्भ

1. ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
2. राष्ट्रसंत जीवनदर्शन – किशोर दिघेकर
3. तरुणांचे तुकडोजी - राम घोडे
4. संत तुकाराम व संत तुकडोजी तुलनात्मक - दर्शन राम घोडे
5. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ति आणि वाङ्मय - संपादक डॉ. अक्षयकुमार काळे
6. राष्ट्रसंतांची अमृतवाणी -- राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज भाग दुसरा
7. मोती ज्यांच्या पोटी -- मधुकर केचे



410

© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

विरहाची जीवघेणी होरपळ : 'तू जाऊन तीन तपं झाली'

श्री. मधुकर बालासाहेब जाधव
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा, जि बुलढाणा (महाराष्ट्र)

कादंबरीकार, कथाकार, समीक्षक म्हणून महेंद्र कदम यांची सर्वत्र महाराष्ट्राला ओळख आहे. त्यांच्या 'चूळपावलं', 'आगळ' या कादंबऱ्या व 'जो मिलो त्याची गोष्ट' हा कथासंग्रह प्रकाशित आहे. भाषाविज्ञान व काव्यसमीक्षेवरील त्यांचे ग्रंथ उल्लेखनीय ठरले आहेत. 'तू जाऊन तीन तपं झाली' या दीर्घकवितेच्या माध्यमातून ते कवी म्हणूनही परिचित झाले आहेत. रफीक सूरज यांच्या रेखाटन प्रकाशनाने प्रकाशित केलेली 'तू जाऊन तीन तपं झाली' ही दीर्घकविता वाचत असताना या कवितेतील संघर्षमय प्रसंगामुळे काळजात कालवाकालव होते. वाचकाची जर ही अवस्था असेल तर प्रत्यक्षानुभूती घेणाराची, या आगीत होरपळणाराची काय मनःस्थिती असेल ? हा प्रश्न मनाला चटका लावून जातो. एखादं संकट आलं असेल तर आपण त्याचा सामना करतो, ते परतवून लावतो. इतरांच्या दुःखात सांत्वन म्हणून आपण त्यास धीरही देतो. परंतु आयुष्यात अशी काही दुःख असतात जी वाटून घेता येत नाहीत आणि कालौघात विसरताही येत नाहीत, आतल्याआत मूकरुदन सुरू असतं जे "आपुला पेला दुःखाचा, डोळे मिटुनि प्यायावा" प्रमाणे सोसत राहावं लागतं.

विरह ही संकल्पनाच मूळात क्लेशकारक आहे. जवळच्या व्यक्तीचा विरह जीवनातील आनंद खिळखिळा करतो. सर्वकाही व्यवस्थित असताना काहीतरी हरवल्याचं दुःख सारखं मनाला बोचत राहतं. आपल्या आईवडिलांचं आपल्याला अकाली सोडून जाणं कायम जिव्हारी लागतं आणि का लागू नये; त्यांच्या हाडामांसाचा गोळा असतो आपण. कोवळ्या वयात जर हा दुःखाचा डोंगर एखाद्यावर कोसळला तर त्याचे आयुष्य मरकटते, ही नाकारता न येणारी वस्तुस्थिती आहे.

कवी वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी आपल्या आईपासून दुरावतात. अजाणतेपणाचं वय ते परंतु, त्यांनी या कवितेत आई शहाबाईसोबतचे अनुभव व तिची संघर्षमय कारकीर्द ज्या पद्धतीने मांडली त्यावरून आई आठवणींच्या रूपात त्यांच्या काळजात अजूनही घर करून आहे, हे सिद्ध होते. तीन तपं अर्थात छत्तीस वर्षे लोटली आईच्या आठवणींचा नंदादीप त्यांनी हृदयात तेवत ठेवला आहे. त्यांना अल्पकाळ जो मायेचा ओलावा लाभला त्याची सर आता येत नाही ही खंताही त्यांनी प्रस्तुत कवितेत व्यक्त केली आहे. गावातील बदलते सामाजिक पर्यावरण, शहरी संस्कृतीचे वाढते अतिक्रमण आणि गावक-यांच्या बोथट होत चाललेल्या संवेदना हा गावाचा विद्रूप झालेला चेहरा त्यांना अस्वस्थ करतो. सहसा नोकरी-व्यवसायाच्या निमित्तानं शहरामध्ये स्थिरस्थावर झालेली माणसं गावाच्या हरवलेल्या संवेदनेचा एवढा विचार करीत नाहीत परंतु त्यांच्या या कळवळ्यातून मातीशी – गावाशी त्यांची नाळ किती घट्ट जुळलेली आहे हे प्रत्ययास येते.

महेंद्र कदम यांच्या आईचा बालपणापासूनचा खडतर असा प्रवास वाचकाचे काळीज छिन्नविच्छिन्न करतो. इच्छा आकांक्षांना तिलांजली देत परोपकारी वृत्तीने व सर्वांना सांभाळून नि सामावून घेत आपलेपणाच्या उदार वृत्तीनं त्यांच्या आईनं आयुष्य सार्थकी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. संसाराचा गाडा ओढताना तिची झालेली ओढाताण तिनं कधीच जाणवू दिली नाही. माणसं सासरकडची काय, माहेरकडची काय आईनं मोठ्या आपलेपणानं सगळ्यांची भिडस्त ठेवली. अठराविश्व दारिद्र्य व होणारा जाच, दुःख आईनं मोठ्या खुबीनं लपवलं. हा प्रवास आईनं केला खरा परंतु, जो त्याग करावा लागला तो फक्त एक स्त्रीच करु जाणे.

"हा सारा प्रवास सोपा नव्हता
मातीत गाडल्या यौवनाच्या
गळ्याचा तो फास होता
तो सोडवताना
तू श्वास कसा घेतला ?" (पृ.१२)



© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P-ISSN 2349-5138)

हा कवीने उपस्थित केलेला प्रश्न वाचकांना अंतर्मुख करतो. स्त्रीसुलभ भावनांवर पोक्तपणाचं चिलखत घालून आईनं जो आदर्श उभा केला तो ग्रामीण भागातल्या कर्तव्यदक्ष स्त्रीचा मूळ पिंड आहे.

आयुष्यात आपल्याला एखादा पुरस्कार मिळतो, एखाद्या ठिकाणी आपले कौतुक होते त्या वेळेला आपल्या एका डोळ्यात आनंदाश्रू व दुसऱ्या डोळ्यात दुःखाश्रू तरळतात. माझी आई असती तर; माझे बाबा असते तर असा आर्त स्वर आपल्या आतून निघतो. फेरफटका मारताना, प्रवासात असताना रस्त्याच्या कडेला खडी फोडणारी, मोलमजुरी करणारी बाया माणसं पाहिली की, काळीज गदगदून येते. त्यांच्यात आपल्या माय बापाला शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न आपण करू लागतो. भला वाटतं ही अनुभूती कवीलाही ही येत असावी कारण त्यांच्या आईनेदेखील कष्टप्रद परिस्थितीचा सामना केल्याचे ते विशद करतात. त्यांच्या आईच्या ढोरमेहनतीला, सोसाव्या लागणाऱ्या हाल-अपेष्टांना तिच्या नव-यालेखी फारशी किंमत नव्हती तरीही त्याच्या खांद्याला खांदा लावून आई दुष्काळाशी लढली, समोर येईल ते काम करत गेली.

'भर उन्हात झटाझोंबा घेत
उपेक्षांना दगडांनी ठेचताना
खडीसकट बा चा मार तू खाल्लेला
अपमानावर पाय देऊन, पुढचा घल्ला गाठलेला
रोज तुझ्या सोबतीला माळ टणक ठरलेला' (पृ.१४-१५)

दुष्काळाच्या झळांपासून लेकराबाळांना वाचवण्यासाठी आईने पचवलेला अपमान वाट्याला आलेली उपेक्षा दगडाने ठेचून ठामपणानं भक्कमपणानं आईचं उभं राहणं हे कवीने "याची देही याची डोळा" अनुभवलं आहे. त्या वयात कवीला खूप काही करण्याची इच्छा असूनसुद्धा काहीच न करता येणं हा आजच्या घडीला अभिशाप वाटू लागतो. याबाबतचं जे वैषम्य आहे ते "या मूक वेदनांचं आम्ही होतो फक्त साक्षीदार" या ओळीतून व्यक्तही करतात. त्यावेळच्या आईबद्दलच्या त्यांच्या निरागस भावना व आत्मीयता आईसाठी काही करण्यापेक्षा कमी नक्कीच नाहीत.

आईचं आजारपण आणि त्या आजारपणातही तिने सांभाळलेली जबाबदारी तिच्या कणखरपणाचे द्योतक वाटते. आजच्या बदलत्या काळाचा व महिला सक्षमीकरणाच्या धोरणाचा विचार करता कविलाच काय सर्वांना या माऊलीबाबत

"बा च्या धाकात सांभाळताना वेळ
कसा घातलास माणुसकीचा मेळ ?" (पृ.१६)

हा प्रश्न भेडसावतो. यामागील कारणही तसेच की, बजरंग गोसावीला आई भाकरी देते, मदत करते, शांताच्या नव-याला जर्मनच्या ताटलीत चहा दिल्याबद्दल दिराला चांगलच झापते. थोडक्यात, माणुसकीचं धोरण कायम पाळणारी व स्पृश्यास्पृश्य भेद टाळणारी आई वाचली की, प्रश्नाचं उत्तर मिळतं. आईच्या आजारपणात कवी शाळा सोडून साल धरतो असं म्हणतात व त्याचे आईने केलेले कौतुक कवीला आनंद देऊन जाते. कवीची बालवयातच आईला धीर देण्याची वृत्ती आईला कर्तव्यपूर्तीचे समाधान नक्कीच देऊन गेली असेल व या वयात शहाणपणाच्या गोष्टी करणारं माझं बाळ मोठेपणी नक्कीच उपाशी राहणार नाही हा प्रबळ आशावाद तीने डोळे मिटताना व्यक्त केला असेल, असं म्हणायला हरकत नाही.

एखाद्यानं सर्वकाही सांभाळण्याचा, परोपकाराचा वसा घेतला की, स्वतः चटके सोसून आपल्यांना जीवापाड जपण्याचं कार्य ती व्यक्ती हयातभर करीत असते, कवीची आई यास अपवाद कशी ठरू शकेल ? भावाकडून कसलीच अपेक्षा न ठेवणारी त्याचं केवळ अस्तित्वच सर्व काही मानणारी आई भावावर जीव ओवाळून टाकते व त्याचं हित चिंतिते. आईच्या वाट्याला हयात असताना जे उपेक्षित जगणं आलं त्याची प्रचिती तिच्या अंत्यविधीवेळी बायांच्या झालेल्या चर्चेतून लक्षात येते. आईच्या कार्यकर्तृत्वाचे मोजमाप ती गेल्यावर व्हावे हे चित्र आज सर्वत्र दिसते. व्यक्तीला स्वतःचे महत्त्व सिद्ध करण्यासाठी स्वतःला झिजवावं लागतं अगदी मृत्यूचा वेढा पडेपर्यंत. ही शोकांतिकाच नव्हे काय ? गाव कवीच्या वेदनेप्रति

IJRAR1904421 | International Journal of Research and Analytical Reviews (IJRAR) www.ijrar.org | 160



© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

जी संवेदना दाखवतं ते आईचं कार्यमहात्म्य म्हणावं लागेल. जुनी पिढी सांगते की चांगली माणसं अल्पायुषी ठरतात. आपण इतिहासाची पानं चाळली तर त्याचा प्रत्ययही आपल्याला येतो. एक मुलगा म्हणून कवीने व्यक्त केलेली खंत३

"पंधरा हे काय लग्नाचं आणि

तीस हे काय तुझं जाण्यायचं वय नव्हतं" (पृ.२१)

वाचकाच्या मनाची घालमेल करते. एकीकडे वयाच्या तीस वर्षांपर्यंत स्वतःच्या मनाप्रमाणे आयुष्याला आकार देऊ पाहणाऱ्या व्यक्ती आपणास आढळतात आणि दुसरीकडे वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत क्षमतेपेक्षाही अधिक ओझं वाहून जगणं सार्थकी लावू पाहणाऱ्या व्यक्ती आढळतात. या कवितेतील आई जीवन सार्थकी लावणाऱ्या स्त्रीची प्रतिनिधी ठरते. आई रेखाटताना बडिलांच्या व्यक्तिमत्वाचेही काही पैलू प्रस्तुत कवितेत उलगडलेले दिसून येतात. तापट स्वभावाच्या बापाचे पत्नी गमावल्यानंतरचे होणारे हाल कवी ज्या पद्धतीने चित्रित करतात त्यावरून पत्नीच्या अस्तित्वाची उणीव बापाला किती पोखरत होती हे सिद्ध होते. सद्यस्थितीला या जर – तरच्या गोष्टी ठरतील परंतु वाचकांना मनोमन असं वाटतं की.

"तुम्ही आई थोर होती घराचं तोरण होती

बाईपणाच्या मंदिराचा खरच ती कळस होती

घरात काही नसलं तरी बाहेर मात्र तुळस होती

दुष्काळात राबताना आनंदीमैलाचा दगड होती

मातीतल्या पिकांसाठी बठिणाईची गाणी होती" (पृ.२५)

हे गावातील महिलांनी हेरलेलं आईचं महत्व तिच्या नवऱ्यानं रूमजून घेतलं असतं तर त्याच्या वाट्याला वनवासी जीवन आलं नसतं. बाई म्हणून निष्ठेचं मूर्तिमंत उदाहरण असलेल्या अनेक माय–माऊल्या कितीही दिव्यातून गेल्या तरी नवऱ्याच्या प्रेमास व सहानुभूतीस पात्र ठरू शकत नाहीत, हे स्त्रीचं दुर्दैव म्हणावं की पुरुषप्रधान संस्कृतीला लागलेला कलंक.

घरातील महत्वाची व्यक्ती आपला कायमचा निरोप घेते आणि त्या घराला, केवळ घरालाच काय; घरपणाच्या संपूर्ण अस्तित्वाला उतरती कळा लागते. यातून सावरणं महाकठीण. कवीची व वहीण – भावंडांची झालेली हेळसांड, शिक्षण सुरू ठेवण्यासाठी त्यांना करावी लागलेली तारेवरची कसरत, आईच्या विरहाने होरपळूनही तग धरण्याची व शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द कवितेतून वाचली की, हेवा वाटतो. कणखर असलेल्या एका कर्तबगार स्त्रीचं रक्त ज्याच्यामध्ये उतरलं आहे त्यालाच हे साध्य होऊ शकतं, हा सर्वमान्य विचारही वाचकाच्या मनात येतो. शिवणकामाचा व्यवसाय करीत गरिबीला टाळे घालण्याचा त्यांचा प्रयत्न, आईच्या विरहाचं दुःख पचवत, तिच्या आठवणीत जगताना आपल्यालाच स्वतःची आई व्हावं लागतं हा थक्क करणारा जीवनप्रवास वाचला की, जगणं इतकं कठीण असू शकतं याचा प्रत्यय येतो.

एखाद्याचा असाही जीवघेणा प्रवास असतो, टोकाचा संघर्ष करावा लागतो हे जीवनमूल्य या कवितेच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये पेरलं जातं. कवीचे दुःख हे वैयक्तिक पातळीवर न राहता त्याला सामाजिक स्वरूप प्राप्त होते. आजही अनाथ चिलेपिले, बालवयात आईला मुकलेली व वाट चुकलेली वासरं सैरभैर झालेली दिसतात. अशा वासरांना न भरकटता प्रवाहाच्या विरोधात आपण पोहायला शिकावं, जगायला शिकावं हा संदेश ही कविता देते.

मायेचा ओलावा मिळाला नाही तर मुलं एकलकोंडी होतात. भावना, संवेदना यावरचा त्यांचा विश्वास उडून जातो. त्यांच्यामध्ये निष्ठुरता बळकटी धरू लागते. नियतीने, निसर्गाने आपल्यावर केलेल्या अन्यायाची सल त्यांना अस्वस्थ करीत राहते. मानवी प्रवृत्ती म्हणून हे घडणेही स्वाभाविक आहे. परंतु ...

"एक मात्र खरं



© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

दुधारक्तासह तुला शोधून घेताना
माझ्यात जे उतरलय
ते प्राणपणाने जपत
पोरांच्ये पेरतोय
मातीत पाय रोवून
आभाळाकडे पाहताना
कुणाचंच बोट रिकामं असू नये
म्हणून डोळ्यात तेल घालून
काळजी घेतोय" (पृ.३१)

या ओळी वाचल्या की, परिस्थितीवरही कुरघोडी करणा–या काही व्यक्ती असतात हे जाणवते. आपल्या वाट्याला आलेलं अभावाचं जगणं नंतरच्या पिढीच्या वाट्याला येऊ नये यासाठीची कवीची तळमळ आणि सजगता, संवेदनेला, माणुसकीला घट्ट धरून ठेवणारी वृत्ती कवीला आईने दिलेली संस्काराची शिदोरी म्हणायी लागेल.

संदर्भ :

१) कदम महेंद्र, तू जाऊन तीन तपं झाली, रेखाटन प्रकाशन, हुपरी, जि. सोलापूर, प.आ. सप्टेंबर, २०१८

Vandalism in College Libraries

Dr.Umesh B.Deshmukh
Librarian, Shri Vyankatesh Arts,
Commerce & Science College,
Deulgaon Dist- Buldana.
Email :- umeshdeshmukh.2010@rediffmail.com

Abstract:-

Libraries are considered venerable, quite peaceful and safe places for study, learning and research, libraries are soul of the educational institutes and play vital role by providing resources and services according to curriculum of the faculty and students. The infrastructure available in the library is resulting ultimately in the dissatisfaction among the young users, which sometimes leads the users to do vandalistic activities. The vandal purposely or ignorantly destruct the beautiful, valuable reading material, library building, furniture and equipment of the college libraries, as well as physical and verbal abuse with library staff and other users. Library is a social institution preserving and disseminating knowledge in the form of documents so any thing which defiles its sanctity, decorum, discipline, beauty concerning library is called as vandalism in library. All forms of library abuses and crimes in the library come under vandalism in the library.

INTRODUCTION

Libraries are considered venerable, quite peaceful and safe places for study, learning and research, libraries are soul of the educational institutes and play vital role by providing resources and services according to curriculum of the faculty and students. As a working professional in library and information science, it is observed that there is noticeable growth in number of the students and faculty in the colleges, It has ultimately resulted in the growth in library users, hence college libraries are facing the problem to cope up with the rising needs of the users and relevant library facility. The infrastructure available in the library is resulting ultimately in the dissatisfaction among the young users, which sometimes leads the users to do vandalistic activities. The vandal purposely or ignorantly destruct the beautiful, valuable reading material, library building, furniture and equipment of the college libraries, as well as physical and verbal abuse with library staff and other users. Library is a social institution preserving and disseminating knowledge in the form of documents so any thing which defiles its sanctity, decorum, discipline, beauty concerning library is called as vandalism in library. All forms of library abuses and crimes in the library come under vandalism in the library.

The present study used Questionnaire method to collect the data from Arts, Commerce & Science College Libraries in Buldhana District. A structured questionnaire was designed separately for users and librarians.

A) Questionnaire for Users consists questions on personal information of users & general nature. Library use and services, different illegal practices, on theft of library material, reasons and measures on mutilation problem, reasons, solutions, methods of theft and mutilation and provision of photocopy equipment for elimination of vandalism. of misplacement, un-authorized borrowing and non-return of book, covers three questions in each section about the users perception, reasons and possible solution to prevent.

B) Questionnaire for Librarians :- Covers questions on basic information about college and library resources and facility. With illegal incidents and most critical issues in college library and consists some questions. ,on period and idea of theft and mutilation, as well as reasons thereof,some questions on vandal activities, disruptive behavior inside and outside library and ,questions on security problems and security measures, policy and procedures, training, eduction and information expected from authority on security, library building and staff, responsibility of security, special security , stock taking, funds to repair vandalized material Instances in last twelve month, on safety security,

The structured questionnaire was distributed to college librarians in the in Buldhana District.

Data Analysis

Collected data has been analyzed and presented in tabular as well as graphical form. In graphical form, bar charts, line graphs are used for presentation. For the purpose of analyzing the data collected, the fixed variables were user's place of residence, gender, age, and income group, the statistical software package (i.e. SPSS) has been used. In addition, some of the tools/techniques used for analyzing data include weighted arithmetic mean (WAM), co-relation, chi-square, Ti-Square etc. Details regarding some of the tools/techniques used

CONCLUSIONS & IMPLICATIONS

Some of the major findings and implications are given below;

1. To sum up, the researcher obtained data from the 1049 users, out of them, 60.53% were male and 39.47% were female, 87.13% users were studying in undergraduate classes, 80.64% of the respondents belonged to the age-group of 17-25 years, 88.2% of respondent belonged to the income group of less than Rs.20,000 per month, which is considered low income

group. As regards place of residence 54.9% respondents came from rural area and 45.9% respondents were from urban area.

2. The membership duration of 78.18 % respondents was from last one to three years; 67.23% respondents were visiting the library almost daily or once in a week; 79.21% respondents used library for academic purpose, while 16% used for fun enjoyment and as meeting point of view and ragging of students. As regards the satisfaction level 60.63% respondents were dissatisfied with the library services. Sixty eight point eighty two percent users were utilizing close access facility and 60.53% users indicated library rules are causing inconvenience in accessing the library services.

3. Only 30.88% users thought illegal practices like theft, misplacement. Un-authorized borrowing, non return of books, vandalism to library property were prevalent & frequent phenomena, while 21.83% users thought that mutilation was prevalent and frequent phenomena in college libraries.

4. Among the reasons for theft 42.13% users suggested, low income and poverty, while 57.01% users thought library environment, cultural background, social environment, overdue fines, no exit guard, slackness in counter checking and un-circulated volumes, seems to be prominent reasons for stealing books in the library.

5. The prominent reasons for mutilation put forth by 35.08% users were, laziness, poverty and lack of reprographic facility, followed by books were very costly to posses personally etc. The same reasons among rural and urban, male and female, age and income group were noticed.

6. As regards method of theft and mutilation 62.44% users suggested hiding in the cloths and tearing out pages from books and periodicals, while 47.65% users suggested method of throwing books through window, by offering inducement, and removing due date slip. Tearing out pages, hiding in the cloths and by offering inducement was the common method among rural & urban, male & female.

7. The 54.15% respondents thought that libraries are victims for deliberate hiding of books. The reasons indicated by 87.22% users were due to monopoly of information, selfish nature, exam pressure and high cost of books, while 10.31% were habitual users in misplacing the documents. Rural users indicated reasons were exam pressure and high cost of books, while urban users were of the opinions that selfish nature, monopoly of information and exam pressure were the main reasons for misplacement.

publicity campaigns and user orientation and training must be in regular interval to control vandalism, by appointing some users as security guards to limit vandalistic activities.

18. As regards the loss of property 96.16% libraries have not responded to the question while only 3.84% libraries indicated the number of missing books, non return books, withdrawal of books, furniture, equipment damage and building damage. Therefore the investigator could not give actual loss of property.

19. Regarding funds reserved for repair vandalized property 80.76% libraries made available funds for repairing library building, equipment and furniture. While 70.19% respondents made provision of funds for repurchase of missing books and guard services, and 30.77% respondents kept funds for insurance premium. While no library has made provision of funds for installing security devises due to the requirement of more funds.

20. As regards the responsibility of library security 61.5% respondents answered librarians and library staff, while 38.5% responded principal, president, security in charge and host institute are most responsible for library security.

21. According 22.43% respondents their library buildings are made, considering the security by design, the 19.93% libraries provided property counter for personal belongings, where as19.32% installed after hour's security alarm, the 17.52% respondents adopted card access control as a security measure in their libraries. Sixteen point seventy four percent respondents agreed vandalism can be limited by appointing security guard, while 11% to 16.74% respondents contacted to police, planted tree away from library building, used keyless entry system, by installing modern security system like CCTV cameras, RFID etc. The other measures suggested by the respondents were fining and punishment, creating awareness among users and appointing some users from user group as a security guard.

22. Regarding any specific policy and procedure to limit vandalism followed by college libraries 68.2% respondents does not have specific policy and procedure to deal with vandal acts, while 54.8% respondents indicated that the policy and procedure of the existing college libraries are not adequate for minimizing or to combat the vandalism. College libraries are not adequately for minimize or combat the vandalism

23. As regards the supports from authority to deal with the security problem WAM test revealed that 27.88% respondents were of the opinion that they require information about how to conduct staff training effectively; 23.57% respondents ranked to provision of sufficient and trained staff; 22.96% respondents' requirement was simple policy and procedures must be there to limit vandalism. The 21.56% respondents gave the rank to community awareness program and 21.24% respondents given preference to building security

to educate and inform the professional as well as to make library staff aware about preventive measures for library security and safety.

7. With regard to loss of books due to theft mutilation, 3 books for open access and 2 books for closed access, per thousand books issued/ consulted in an academic year may be considered as negligible loss and hence be written off by the principal/ governing body of the college, if librarians negligence is not proved, If the loss is beyond prescribed limit the matter may be referred by the principal to the higher authority concerned.

8. To prevent theft, mutilation from libraries, librarians should make available number of text books and quality reprographic equipment in cheaper cost of photocopying with trained operator.

9. Well documented Library policy and procedures should be framed by the librarian as per the ACRL and ALA guidelines when there is a case of vandalism, it should be available for all staff members and users to read, either as a separate booklet or as part of library manual or in college prospectus.

10. The report of every stock verification work should be submitted to the concerned University, Principal and Joint director of higher education and UGC by which any person can study and calculate actual loss from college libraries.

11. The librarians should concentrate on maximum security of library collection, property and staff by appointing security guard, conducting seminars, installing modern security devices, formulating user group as security guard, give weighting to opinions of students council, union members thereby involving earn and learn scheme students on a partnership basis in running the library and making library a more positive place to work etc.

12. The library should aim to create an atmosphere conductive to honesty and pro-library feelings, while at the same time acknowledge the necessity to set up sensible and thorough security arrangements.

13.A vigorous publicity campaign through posters on acts of vandalism and with emphasis on the penalty of expulsion to culprits can, to a certain extent, check the malfeasance of vandalism in libraries.

14. Library staff should be more vigilant, committed to library work, training on crime and vandalism prevention techniques should be given to staff on regular intervals. Periodic assessment of vandalism situation should be done. On security audit pinpointing the weakness of security of library should be made.

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

15. Library building design should be theft preventive, one exit and entrance, wire mesh windows, provision of property counter, eliminate hidden location, plantation of tree should be away from library building, provide adequate visibility in parking and inside building, proper parking facility with gate and watchman should be provided.

16. Disciplinary measures relating to vandalism, disruptive behavior, theft, document mutilation, refusal to return borrowed books, and keeping books long after they are due should be enforced. Offenders should be made to replace or pay for lost books irrespective of their status and to pay fines for over-due books.

17. Authorities should invest more in electronic resources which will reduce to a large extent the incidence of users physically handling documentary materials. This will also enhance multiple accesses to library materials with little damage.

REFERENCES

- Cohen, Stanley (1973). Property destruction; Motive and meanings 'Vandalism', Ed. Colin ward, London, Architectural Press.
- Das, B.N.(1986). Principles of Education in the Emerging Indian Society, Delhi Ajanta Prakashan, p,2.
- Garner, Bryan A. (1990) Ed. Blacks Law Dictionary, 6th Ed. West Publishing, New York, available on http://en.wikipedia.org.
- Gavisiddapa, Anandhali (2004). Use and misuse of Reading Material in Engineering college Libraries in Karnataka State: A Study, Thesis submitted to Gulbarga University Gulbarga.
- Goldstein, A.P. (1996). The Psychology vandalism New York: Plenum Press.
- Hart, Sandra (2003). Vandalism in libraries: Causes, common occurrences and prevention strategies. available on http://capping.slis. accessed on 15-03-2011.
- Kasyap, M.M.(1969) Planning of Survey, Library Herald, 2 (1&2), P,95
- Khan, Khaisar M. & Ramesh, C.P. (1986). Vandalism in Academic Libraries : Library Herald, 25(1), 38-41.
- Rawat, P. & Kumar P. (2002). Encyclopedic Dictionary of Library Science and Information Technology, Vol.2, 1st Ed., New Delhi, Publication House.
- Sager, Donald (1975). Vandalism in Libraries, How Senseless is it? : Indian Librarian, 30 (2), 61-63.
- Thomson, Della.(1998). The Concise Oxford Dictionary of current English, 9th ed. Delhi, oxford Publishing

© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

भारतीय अर्थव्यस्थेतील विशेष आर्थिक क्षेत्र विषयक धोरण आणि मानवी हक्क

डॉ. ज्ञानेश्वर विष्णू गोरे
सहायक प्राध्यापक तथा प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)

प्रस्तावना:

युनाइटेड स्टेट्स ऑफ सोव्हिएट रशियाच्या आर्थिक विकासाने प्रभावित होऊन भारत सरकारने सन. 1951 मध्ये नियोजनबद्ध मार्गाने आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंचवार्षिक योजनांचे प्रतिमान स्वीकारले. सन 1951 ते सन 1991 या आर्थिक नियोजनाच्या कालावधी दरम्यान 'समाजवादी समाजरचनेचे' उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन भारत सरकारने देशांतर्गत उद्योगांना संरक्षण, आयात पर्यायीकरण, रोजगार निर्मितीसाठी श्रम प्रधान तंत्राचा स्वीकार, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना प्राधान्य, इत्यादी प्रयत्न केल्याचे दिसून येतात. परंतु देशांतर्गत व विदेशी कर्जाचे वाढते प्रमाण, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढती तूट, राजकोषीय व वित्तीय तुटीचे सकाळ देशांतर्गत उत्पादितांशी वाढते प्रमाण इत्यादी विविध कारणांमुळे भारत सरकारसमोर सन 1990 मध्ये निर्माण झालेल्या ऐतिहासिक 'आर्थिक आरिष्टातून' बाहेर पाडण्यासाठी भारत सरकारने 24 जुलै, 1991 रोजी आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक अधिकोष यांनी सुचविलेल्या 'आर्थिक स्थिरीकरण व संरचनात्मक बदलांचा कार्यक्रम' स्वीकारला. आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक अधिकोष यांनी सुचविलेला हा कार्यक्रम म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेतील खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रियांचा समावेश असलेले 'नवीन आर्थिक धोरण' होय.

भारत सरकारने एप्रिल, 2000 मध्ये जाहीर केलेले 'विशेष आर्थिक क्षेत्र धोरण' व सन 2005 मधील 'विशेष आर्थिक क्षेत्र कायदा' हे भारत सरकारच्या नवीन आर्थिक धोरणाचाच फलित आहेत. भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्रांच्या स्थापनेसाठी स्वीकारलेल्या धोरणांचा भारतातील मानव अधिकारांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करून आर्थिक विकास प्रक्रियेत विशेषत: विशेष आर्थिक क्षेत्र धोरणांमुळे भारतात निर्माण झालेल्या मानवी हक्क विषयक समस्यांचा अन्यास करून या विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी विविध धोरणात्मक उपाय सुचविणे या उद्देशाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

भाग 1:

संशोधन पद्धती व शोध निबंधाची उद्दिष्टये

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम माहितीवर आधारित असून तथ्य संकलनासाठी भारत सरकारची विविध कार्यालये तसेच विविध आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना यांचे अहवाल तसेच प्रकाशित ग्रंथ, नियतकालिके व प्रमाणित संकेतस्थळांवरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

Ethnobotany is considered as a branch of ethnobiology. The term "Ethnobotany" was coined by J. W. Harshberger in 1895 to indicate plants used by the aboriginals: From "ethno"-study of people and "botany" study of the plants. Ethnobotany is the study of how people of a particular culture and region make of use of indigenous plants. Ethnobotanists explore how plants are used for such things as food, shelter, medicine, clothing, hunting, and religious ceremonies. *Leguminosae*, commonly known as the legume, pea, or bean family, is a large and economically important family of flowering plants. It includes trees, shrubs, and perennial or annual herbaceous plants, which are easily recognized by their fruit (legume) and their compound, stipulated leaves. Many legumes have characteristics of flowers and fruits. The family is widely distributed, and is the third-largest land plant family in terms of number of species, behind only the *Orchidaceae* and *Asteraceae*, with about 751 genera and some 19,000 known species.

Study area
Buldhana district having hilly and forest area near the range of Gavilgad hills. The district is situated partly in Tapi basin and partly in Godavari basin. The total area of district is 9640 sq kms. The forest covers an area of 1151.83 sq. Km near about 11.92% of the district. The proposed study is carried out in Deulgaon Raja tahasil.

Materials and Methods
Research work was carried out during June 2016 to December 2017 in the area of Deulgaon Raja tahasil. Field work was carried out in order to investigate the existing ethnobotanical practices.of the family *Leguminosae* were collected, dried, documented and were identified Plants were identified using relevant scientific literature (Hooker 1872 – 1877; Cooke 1967 (Rpr.); Sharma *et al.* 1996; Naik 1998; Singh and Karthikeyan, 2000; Singh *et al.* 2001).
About 100 informants were interviewed in this regard. Voucher specimens are deposited in the Department of Botany, Shri Vyankatesh Arts, Com & Sci College, Deulgaon Raja, Dist. Buldhana (M.S.). Valid scientific name, local name, Family and ethnomedicinaly uses are described.

Observation and Results
The present study aimed to investigate the plants used by the local peoples of Tehsil area for their medicinal values. The present study has brought in to light 09 plant species of *Leguminosae* families used for a medicinal purposes by local peoples. A brief information including botanical name, local name, parts used and their medicinal value by the peoples is mentioned. The local people and villagers are using these plants to cure many diseases i.e. the skin diseases, scabies, wounds, boils, vomiting, fatigue, blood purifier, antipreganancy, urinogenital disorder, toothache, menstrual disorder, hypertension, cough, diarrhea, dysentery, wound healing, diabetes, jaundice, unstroke, fever, headache etc. are the major diseases in the villages. They prepare the plant product as decoction, oral treatment, ointment etc. The extracts and the paste are the two main methods for treatments of diseases. The plant parts used for medical preparation were bark, roots, rhizome, leaves and whole plants. In some cases the whole plant including roots was utilized. The Deulgaon Raja Tehsil of Buldhana district are rich in medicinal plants. Present investigation indicates that study area of Deulgaon Raja Tehsil of Buldhana district is blessed with magnificent diversity of ethno-medicinal plants used to cure many diseases. The present study will give new incentive to the traditional system of healthcare.

List of ethnomedicinal plants with their uses
Acacia nilotica

Botanical name	*Acacia nilotica*
Local name	Babul
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use
- Traditionally harvested the seeds to be ground into flour and eaten as a paste or baked into a cake. The seeds contain as much as 25% more protein than common

cereals, and they store well for long periods due to the hard seed coats.
- Plant Secrets Gum.

Fig 1

2) Acacia catechu

Botanical name	*Acacia catechu*
local name	Khair
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use
- Seeds are a good source of protein
- An extract of its heartwood, is used as an ingredient to give red color and typical flavor to paan
- A wood extract called catechu is used in traditional medicine for sore throats and diarrhea
- The concentrated aqueous extract, known as khayer gum or cutch, is astringent
- It is also used for its actions like anti-dyslipidemic, anthelminthic, anti-inflammatory, anti-diuretic, anti-pruritic, coolant, taste promoting, enhancing digestion and curing skin disorder.

Fig 2

3) Butea Monosperma

Botanical name	*Butea Monosperma*
Local name	Palas
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use
- Chakradatta described its gum as astringent and seeds as anti-parasitic.
- Palash is considered anti-inflammatory, antimicrobial, anthelmintic, anti-diabetic, diuretic, analgesic, antitumor and astringent.
- Its leaves are astringent, diuretic and anti-ovulatory properties. Its flowers are tonic and nutritive. Its roots are used to treat night blindness.

Fig 3

Dalbergia latifolia

Botanical name	*Dalbergia latifolia*
Local name	Shisam
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use
- Cures: diarrhea, Indigestion, obesity, Dermatoses, Sciatica
- Good in fever, Heals Ulcers.
- Normalizes over bleeding in Menstrual cycle

Fig 4

Dalbergia sissoo

Botanical name	*Dalbergia sissoo*
Local name	Shissu
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use
- Skin disorders and stomach related issues, obesity, non-healing wounds, ulcers, intestinal parasites.

Fig 5

Pongamia pinnata

Botanical name	*Pongamia pinnata*
Local name	Karanj
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use

- yields a black gum that has historically been used to treat wounds caused by poisonous fish
- Juices from the plant, as well as the oil, are antiseptic and resistant to pests.
- The oil has a high content of triglycerides, and its disagreeable taste and odor are due to bitter flavonoid constituentsincluding karanjin, pongamol, tannin and kara njachromene.

Fig 6

Tamarindus indica

Botanical name	*Tamarindus indica*
Local name	Chinch, Imali
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use

- Seed, leaf, leaf veins, fruit pulp and skin extracts of tamarind possessed high phenolic content and antioxidant activities.
- The fruit of the tamarind is used as a poultice applied to foreheads of fever sufferers.
- The fruit exhibits laxative effects due to its high quantities of malic acid, tartaric acid, and potassium bitartrate.
- Its use for the relief of constipation has been documented throughout the world.

Fig 7

Cassia fistula

Botanical name	*Cassia fistula*
Local name	Amaltas
Habit	Tree
Habitat	All terrestrial habitats

Local use

- In Ayurvedic medicine, the golden shower tree is known as *aragvadha*, meaning "disease killer". used in the treatment of inflametory swellings and as a cleaning agent for ulcers and wounds.
- The fruit pulp is considered a purgative.

Fig 8

Cassia auriculata

Botanical name	*Cassia auriculata*
Local name	Tarvar
Habit	Shurb
Habitat	All terrestrial habitats

Local use

- The root is used in decoctions against fevers, diabetes,

1381

diseases of urinary system and constipation.
- The leaves have laxative properties.
- The dried flowers and flower buds are used as a substitute for tea in case of diabetes patients.
- The powdered seed is also applied to the eye, in case of chronic purulent conjunctivitis.

Fig 9

Acknowledgement
The authors are thankful to the local practitioners and forest officials who provided valuable information on this subject. The authors are thankful to Principal of Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College for encourangement and guidance. We are also thankful to the authorities of various herbaria and musea for their help and cooperation extended during the research work.

References

1. Christenhusz MJM, Byng JW. The number of known plants species in the world and its annual increase. Phytotaxa. Magnolia Press. 2016; 261(3):201-217.
2. Judd WS, Campbell CS, Kellogg EA, Stevens PF, Donoghue MJ. Plant systematics: a phylogenetic approach, Sinauer Axxoc, 2002, 287-292. ISBN 0-87893-403-0
3. Stevens PF. Fabaceae. Angiosperm Phylogeny Website. Version 7 May, 2006. Retrieved 28 April 2008.
4. British Pharmacopoeia. Department of Health, British Pharmacopoeia Commission, London. The Stationery Office, Khadira (*Acacia catechu*) | National R & D Facility for Rasayana. filht. org. Retrieved 2014-10-04.
5. Doughari JH. Antimicrobial Activity of *Tamarindus indica*. Tropical Journal of Pharmaceutical Research. 2006; 5(2):597-603.
6. Havinga Reinout M, Hartl Anna, Putscher Johanna, Prehsler Sarah, Buchmann Christine, Vogl Christian R. *Tamarindus Indica* L. (Fabaceae): Patterns of Use in Traditional African Medicine. Journal of Ethnopharmacology. 2010; 127(3):573-588.
7. Panthong A, Khonsung P, Kunanusorn P, Wongcome T, Pongsamart S. The laxative effect of fresh pulp aqueous extracts of Thai Tamarind cultivars. Planta Medica. 2008; 74(09).
8. Pole Sebastian. Ayurvedic Medicine: The Principles of Traditional Practice. Singing Dragon. 2012, 129. ISBN 1848191138. Retrieved November 10, 2012.
9. Bhagwan Dash, Vaidya. Materia Medica of Ayurveda. India: B.Jain. 2002, 41-42. Retrieved November 10, 2012.

© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

An overview of medicinal uses of Medshingi (*Dolichandrone falcata*) in Deulgaon Raja Tahasil,Buldana (MS), India

Kakde N.P, Salve M.S.
Department of Botany, Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College,
Deulgaon Raja Dist. Buldhana, Maharashtra, India

Abstract

Medicinal plants are boon to human beings. Plants are used for medicinal purpose long before prehistoric period. Plant parts like fruit, stem, leaves, roots etc are used as medicine. Medicinal uses of Medshingi belongs to family Bignonaceae growing throughout the Deulgaon raja was carried out during April to June 2018.

Keywords: Medshingi, Bignonaceae, Medicinal uses, Deulgaon Raja, Buldana (MS), India.

Introduction

The plant is commonly known by the name Medshingi (*Dolichandrone falcata*) belongs to family Bignonaceae. Plant is small to medium sized deciduous tree,15 to 20 feet in height, native to Indian subcontinent, leaves simply pinnate 3 to 6 inches long, leaflets are 5-7 obovate, around elliptical, sometimes with a small blunt Points, glabrous. Flowers are white and fragrant born in mostly 1- 3 flowered corymbs. Stock of flower is 1/2 inch long sepal tube is 1.2-2 cm split on one side to the base. Petals of the flower are frilly. Fruits are capsules, nearly quadrangular, curved like sheep horns hence commonly known as medshingi. Tree grows slowly even in best soils, drought resistant fit for propagation in the driest localities. Flowering during April - June. Buldhana district having hilly and forest area near the range of Gavilgad hills. The district is situated partly in Tapi basin and partly in Godavari basin. The total area of district is 9640 sq kms. The forest covers an area of 1151.83 sq. Km near about 11.92% of the district. The proposed study is carried out in Deulgaon Raja tahasil.

Location Map of Study Area

© 2018 IJRAR October 2018, Volume 5, Issue 4 www.ijrar.org (E-ISSN 2348-1269, P- ISSN 2349-5138)

Objectives of study

- The main aim was to collect the information from local people about the medicinal uses of plant.
- To increase public awareness about the efficacies of herbal drugs.
- Documentation of the drugs and methods used by traditional healers.

Methedology

The research work was carried out during April to June 2018 in the area of Deulgaon Raja Tahasil. The field work is carried out in order to investigate the traditional practices of medshingi the plant material were collected from nearby area of Deulgaon Raja. The plant material is authenticated from Department of Botany Dr.BAMU, Aurangabad.

Dolichandron falcata

Botanical name	:	*Dolichandrone falcata*
Local name	:	Medshingi
Family	:	Bignonaceae
Habit	:	Tree
Habitat	:	All Terrestrial habitat

Local uses

- Leaf juice is rubbed on abdomen of pregnant women to ease delivery.
- Leaves decoction is used in body pains.
- Leaves paste is applied on forehead to relieve headache and on swollen glands.
- The bark is abortifacient.
- The boiled bark paste is applied on fractured bones or sprains.
- Leaves along with curd or buttermilk is used against piles.
- The powdered fruits are taken for stomachache.
- The fruits are used in diabetes urinary disorders Bronchitis skin diseases.
- Leaves are used against menorrhagia and leucorrhoea.

Conclusion

From the present study it is observed that the specific doses of different parts of plant (Medshingi) are used by the local peoples to cure Body pains, Headaches, Swellings, Fractures, Piles Stomach aches, Diabetes, Urinary disorders, Bronchitis Skin diseases, Menorrhea and Leucorrhea. Such a plants are great potential resource and can full fill the basic demand of surrounding peoples.

Acknowledgement

The authors are thankful to the local practitioners and forest officials who provided valuable information regarding medshingi. The authors are thankful to Princilal of Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College for encourangement and guidance. We are also thankful to the authorities of various herbaria and musea for their help and cooperation extended during the research work.

References

- Chopra 1956 glossary of Indian medicinal plants.
- Khare 2007 Indian medicinal plants and illustrated dictionary.
- Quattrocchi 2012 CRC world dictionary of medicinal and poisonous plants.
- Nadkarni A K Indian materia medica.
- Basu and Kratikar 1918 Indian medicinal plants.
- Kirtikar B. Indian Medicinal Plants with illustration. Sri Sadguru Publication. 2001; 8: 2532.
- Ernst E. Phytomedicine 2006; 13: 205–208.

VOLUME - VI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

१९

'कमाविसदार' मराठाकालीन मुलकी अधिकारी

प्रा. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे
इतिहास विभाग प्रमुख, श्री. व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा.

मध्ययुग हा सर्वकष हुकूमशाहीसाठी अनुकूल असा कालखंड होता. या कालखंडात शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित उत्कृष्ट प्रशासन निर्माण करून आजच्या लोकशाही शासन व्यवस्थेसमोर आदर्श निर्माण केला. हे करताना त्यांनी शिवपूर्वकालीन प्रशासनातील दोष काढण्यासाठी सुधारणावादी धोरण अमलात आणले. त्यामुळे सरसुभ्यापासून गाव पातळीपर्यंतच्या प्रशासनात अनेक बदल घडून आले. परिणामी 'कमाविसदार' या महसूल अधिकाऱ्याचा उदय झाला. त्यामुळे महालापासून गाव पातळीपर्यंत अनेक कमाविसदार उदयास आल्याचे दिसतात. परंतु, शिवकाळात विशेषत: महसूल वसूलीसाठी प्रसिध्द असलेला कमाविसदार हा पेशवेकाळात परगण्यातील पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून वावरताना दिसतो.[१] तसेच पेशवेकाळात कमाविसदाराच्या अधिकारातही वाढ झाल्याने तो मराठा प्रशासनात महत्त्वाची भूमिका पार पाडू लागल्याचे दिसते. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे कमाविसदाराचा इतिहास प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कमाविसदाराचा उदय

शिवपूर्वकाळामध्ये देशमुख व देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी होते.[२] तेच परगणा प्रमुख होते. त्यांना 'जमीनदार' असेही संबोधत. या जमीनदाराच्या अधिपत्याखाली खेडयातील जनतेवर अत्याचार होत असे.[३] तसेच "सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा, त्यांसी निष्ठेने वर्तावे, कोणचा अन्याय न करावा, हे याची (वतनदाराची) बुध्दि नाही. नूतन संपादावे, बळकट व्हावे, बळकट झाले म्हणजे येकाचे घ्यावे, दावे दरखडे करावे, हा त्याचा हव्यास आणि या वतनासाठी ते वाटेल ते करतील. देशद्रोह, तिकडील भेद इकडे इकडील भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करितात. मग तेच राज्याचे अपायभूत होऊन दु:साध्य होऊन जातात. याकरिता या लोकांचे संरक्षण परम युक्तिजन्य आहे."[४] वतनदारासंबंधीच्या आज्ञापत्रातील या वर्णनावरून शिवाजी महाराजांचा वतनदाराच्या वर्तनावर विश्वास नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना वतनदार मंडळीकडून विरोध होऊ नये, म्हणून त्यांचे अधिकार काढून घेण्याचा निर्णय घेतला.[५] व त्याऐवजी वेतनी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. या संदर्भात न्या. रानडे म्हणतात की, "शिवाजीच्या पूर्वी जमीन्दाराकडे जी कामे असत, ती करण्यास त्यान्चे पगारी न्योकर कमाविसदार, महालदार आणि सुभेदार ठेवले होते."[६] श्री. वेळूसकर म्हणतात की, "दोन्ध किंवा तीन्ध खेडयावर एक कमाविसदार (वसूली अधिकारी) न्येमलेला असे. कमाविसदाराच्या कामावर महालकरी हा देखरेख ठेवीत असे,"[७] यावरून्ध शिवाजी महाराजांनी महसूल वसूलीसाठी जे वेतनी अधिकारी सरकारकडून नियुक्त केले. त्यामध्ये कमाविसदार एक होय.

सुरूवातीला कमाविसदार हा स्वतंत्र अधिकारी, व्यवस्थापक किंवा वहिवाटदार म्हणून वावरताना दिसतो. सोबत नवीन प्रदेश जिंकून तो मराठी राज्यास जोडल्यावर त्याचा बंदोबस्त करण्यास ज्या अधिकाऱ्यास नेमीत त्यासही 'कमाविसदार' म्हणत.[८] तसेच सरकारी अंमलदाराशिवाय प्रत्येक गांवी आपापला हक्क, मान व उत्पन्न गोळा करणारे त्या काळी अनेक लहान मोठे पोट अंमलदार असत आणि त्यासही 'कमाविसदार' हेच सामान्य नाव दिलेले असे. त्यामुळे हया सर्वांना अनुलक्षून मेस्तकातील उताऱ्यात 'इत्यादि अवघे कमाविसदार' असे म्हणून पंसवीस कमाविसदारांची यादी दिली आहे.[९] त्यामुळे शिवाजी महाराजांच्या काळात महसूल अधिकारी म्हणून कमाविसदाराचा उदयास झाला असला, तरी पुढे त्यांची एक श्रेणी निर्माण झाल्याचे दिसून येते.

कमाविसदाराची नियुक्ती व बडतर्फी

'कमावीस' म्हणजे गोळा करणे या अर्थाने शिवकाळात महसूल वसूल करण्यासाठी कमाविसदार पद निर्माण करण्यात आले. महसूल व्यवस्थेतील हे महत्त्वाचे पद असल्याने मामलेदार व सरसुभेदार यांच्यासमवेत कमाविसदाराच्या नेमणूका, बदल्या व बडतर्फ्या हया छत्रपतींकडून

VOLUME - VI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

होत असल्याचा उल्लेख सापडतो.[१०] शिवकाळाप्रमाणेच पेशवेकाळात देखील मूलकी अधिकाऱ्यात कमाविसदारांचा जास्त भरणा होता. एक गाव, अनेक गांवे किंवा कधी कधी संपूर्ण परगण्यावरही कमाविसदाराची नियुक्ती केली जात असे[११] आणि ही नियुक्ती करण्याचे अधिकार मध्यवर्ती सरकारकडे होते.[१२]

कमाविसदाराने सरकारकडे सादर केलेल्या महसूलाच्या हिशोबाची तपासणी हिशोब तपासणीकाकडून केला जात असे. त्यामध्ये जर काही अफरातफर झाल्याचे आढळले, तर सदर कमाविसदारास आपली 'कमावीस' व 'रसद' दोन्ही गमावू असे वाटत असे. कारण 'कमावीस' ही वंशपरंपरेने मिळत नसून काही वर्षांकरिता ती सरकारकडून काही अटींवर मक्त्याने मिळालेली असे.[१३] नवीन प्रदेश जिंकल्यानंतर त्या प्रदेशात पेशव्यांची वसूल पध्दती लागू करणे शक्य नसे. यासाठी कोठे खंडपध्दती तर कोठे मक्त्याची पध्दती तात्पुरती सुरू करावी लागे व मागाहून काही वर्षांनी स्थिरस्थावर झाल्यानंतर शेतकऱ्यांना पाच वर्षांचा कौल देणे सोयीचे ठरे. मक्त्याच्या पध्दतीत मामलेदार अगर आणि कमाविसदार काही ठरली रक्कम सरकारास जमीन महसूल म्हणून देत व कुळाशी परभारे करार करून त्याजपासून वसूल घेत.[१४] शिवकाळातही हिच परिस्थिती होती.

कमाविसदाराच्या एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी वारंवार बदल्या केल्या जाई, परंतु पेशवेकाळात आपल्या अधिकारपदाची मुदत वारंवार वाढवून घेण्यात ते यशस्वी ठरत असले, तरी त्यांच्याकडून काही गुन्हा घडल्यास अशाप्रकारची मुदत वाढ मिळत नसल्याचे दिसते.[१५] यावरून कमाविसदाराची नियुक्ती व बडतर्फी करण्याचा अधिकार मध्यवर्ती सत्तेला होता आणि ही नियुक्ती अल्पमुदतीची व काही अटींवर मक्त्याने मिळालेली असे. तसेच कमाविसदाराच्या अधिकारात बदल करण्याचा व हिशोबात काही अफरातफर केली, तर मक्ता रद्द करण्याचा अधिकार सरकारला होता. त्यामुळे आपली कमावीस अथवा मक्ता जाऊ नये, यासाठी कमाविसदार प्रामाणिकपणे कार्य करीत असावे, असे दिसते.

कमाविसदाराचे अधिकार व कार्य

मराठा कालखंडात गावापासून तर महालापर्यंतच्या प्रत्येक विभागावर कमाविसदार अधिकारी होता. शिवकाळात सरकारी महसूल, आपले हक्क, मान व उत्पन्न वसूल करण्याचा अधिकार कमाविसदारांना होता.[१६] याशिवाय शिवकाळातील कमाविसदाराच्या अधिकार व कार्याविषयी फारशी माहिती उपलब्ध होत नाही, परंतु कमाविसदार हा गट प्रशासनाचा प्रमुख असल्याने महालाचा अधिकारी हवालदार याच्या कामासारखे त्याच्या कार्याचे स्वरूप असावे, असे दिसते.

पेशवेकाळात मात्र कमाविसदाराच्या अधिकार व कार्यात व्यापक स्वरुपात बदल झाल्याचे दिसून येते. या संदर्भात डॉ. सेन म्हणतात की, "पेशवेकाळात कमाविसदार हे महालातील पेशव्यांचे प्रतिनिधी होते. म्हणूनच त्यांचे कामकाज व जबाबदाऱ्यांचे स्वरूप हे सर्वसमावेशक आणि सर्वंकश होते."[१७] एखाद्या उमेदवारास जेव्हा 'कमावीस' किंवा 'मामलत' दिली जाई, तेव्हा त्याच्याकडून सरकारला काही आगाऊ रक्कम दिली जात असे, तिला 'रसद' असे म्हणत. पुढे ही रक्कम महसूलाच्या उत्पन्नातून वेगवेगळ्या दराच्या व्याजासह तो उमेदवार परत वसूल करून उरलेली रक्कम सरकारकडे जमा करीत असे. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार सरकारला होता.[१८] तसेच जेव्हा कमाविसदार व मामलतदार यांच्या नवीन नेमणूका होत, तेव्हा महालांचे देशमुख व खेडयांचे मुकादम यांना नवीन कमाविसदारांकडे हजेरी देण्याबद्दल आपापल्या भागातील महसूल त्याच्या स्वाधीन करण्याबद्दल सूचना देण्यात येत असत. कमाविसदार हे परगण्यातील पेशव्यांचे प्रतिनिधी असल्याने जेव्हा जेव्हा लोकांना सूट जाहीर करण्यात येई. नवीन जहागिरी दिल्या जाई आणि जमिनीच्या किंवा इतर प्रकारच्या संपत्तीचे खरेदी विक्रीचे व्यवहार होत असत, तेव्हा तेव्हा त्याची माहिती कमाविसदाराला अनिवार्यपणे दिली जात असे. आपापल्या परगण्यातून वा खेडयातून महसूल जमा करून तो सरकारात भरणे हे कमाविसदाराचे मुख्य कर्तव्य होते. तसेच खेडेगावात केलेल्या जमाबंदीनुसार त्यांना वसुली करावी लागे. लोकांवर जादा कर बसविण्यास त्यांना मनाई होती. आपल्या हुद्यावर रूजू होण्यापूर्वी त्यांना दिलेल्या जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे (बेहेडा) महसूली कारभार करणे आवश्यक होते.[१९]

VOLUME - VI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

परगण्याचे प्रमुख या नात्याने परगण्याचे महसूली उत्पन्न वाढावे, यासाठी पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांना तगाईच्या रूपाने आर्थिक मदत मिळवून देणे व ती हप्त्याहप्त्याने वसूल करणे, पडीक जमिनीवरील साऱ्यात सूट देणे, परगण्यातील धरणांची व तलावांची दुरूस्ती करणे, बागायती जमिनीचे क्षेत्र वाढविणे आणि परगण्यातील व्यापार व उद्योगधंदे वाढीसाठी प्रयत्न करणे इत्यादी कामे कमाविसदारास करावी लागत असे.[२०] याशिवाय परगण्यातील टांकसाळीवर लक्ष ठेवून खाजगी विनापरवाना टांकसाळी बंद करणे, परगण्यातील शिबंदी मजबूत राखणे, घाटातून देशावर व कोकणात जाणाऱ्या मालावरील जकात वसूल करणे, परगण्यात शांतता सुव्यवस्था ठेवण्यासाठी सैन्याची व्यवस्था करणे, त्यावर देखरेख ठेवणे, चोर व दरोडेखोर यांना शिक्षा करणे आणि स्थानिक लोकांनी केलेल्या उठवांचा बंदोबस्त करणे इत्यादी कामे त्यास करावी लागत असे.[२१] त्याचप्रमाणे महालातील शिबंदी व पोलीस दल हे देखील कमाविदाराच्याच नियंत्रणाखाली होते.[२२]

कमाविसदारास आपल्या विभागातील न्यायालयीन कामे पार पाडण्यासाठी काही न्यायालयीन अधिकार देण्यात आले होते. त्यानुसार कौटुंबिक मालमत्तेसंबंधीचे कज्जे निकालात काढणे, कर्जासंबंधीचे भांडणे सोडविणे ही कामे त्यास गावातील पंचायतीच्या मदतीने करावी लागत असे. पंचायतीमधील सदस्यांची नेमणूक करण्याचाही अधिकार कमाविसदाराला होता. घरासंबंधी कज्जे, जागेसंबंधी किंवा इतर किरकोळ भांडणे सोडविणे ही न्यायालयीन कामे तो पंचायतीची मदत न घेता सोडवित असे, मात्र पंचायतीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी कमाविसदार हा पेशवे सरकारची परवानगी घेतल्याशिवाय करू शकत नसे. फौजदारी गुन्ह्याच्या बाबतीत तर त्याला काहीच अधिकार नव्हते. फक्त अशा गुन्ह्यांची तो पेशवे सरकारच्या आदेशावरून निःपक्षपणे चौकशी करून अहवाल सादर करू शकत असे.[२३]

पेशव्यांच्या काळात कमावीसबद्दल एक आश्चर्यकारक पध्दत रूढ होती. ती म्हणजे राज्याच्या बाहेरील विशिष्ट प्रांताची कमावीस एखाद्या उमेदवाराला देणे व तो प्रदेश जिंकून घेण्याची त्यास आज्ञा देणे. अशा प्रकरणी त्याच्या ताब्यात दिलेला महाल जिंकून घेण्याकरिता आवश्यक ते सैन्य उभारण्याची परवानगी त्या कमाविसदारास देण्यात येत असे, मात्र यासाठी त्यास ठरवून दिलेले सैन्यच उभारावे लागत असे, अधिकचे सैन्य उभारण्यासाठी सरसुभेदाराची आगाऊ संमती घ्यावी लागे. त्याच्या कार्यात तो यशस्वी झाला, तर आलेल्या उत्पन्नातून लष्कराचा खर्च वजा करून बाकी रक्कम त्यास सरकारात जमा करावी लागत असे आणि जर तो अयशस्वी झाला, तर लष्कराचा खर्च सरकारी पैशातून देण्याची त्याला मनाई केली जाई.[२४]

कमाविसदारास सरकारने दिलेले अधिकार व कार्यांच्या अंमलबजावणीसाठी त्याच्या हाताखाली मोठी सरकारी यंत्रणा असून तिच्यात मुजूमदार, फडणीस, दफ्तरदार, सबनीस, पोतदार, चिटणीस, ठाणेदार, नाकेदार, तर्फदार, कारखानीस, घोडेस्वार आणि शिपाई याअधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता.[२५] या यंत्रणेच्या साहयाने कमाविसदार आपल्या विभागाचा कारभार पाहत असे.

वरील विवेचनावरून शिवाजी महाराजांनी महसूल वसूलीसाठी वतनदाराऐवजी कमाविसदार हे पद निर्माण केले, परंतु पेशवेकाळात या पदाचे महत्त्व वाढून ते पेशव्यांचे प्रतिनिधी बनले व महसूल वसूलीसोबत परगण्याचा प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडताना दिसतो. याशिवाय पेशवेकाळात कमाविसदारास राज्याबाहेरच्या प्रदेशाची कमावीस दिल्या जाई व त्यासाठी सैन्य ठेवण्याचाही अधिकार दिल्याने राज्यविस्तारातही कमाविसदाराचा उपयोग होत असल्याचे दिसून येते.

कमाविसदाराचे वेतन व भत्ते

कमाविसदार हा महत्त्वाचा अधिकारी असल्याने त्यांचा चांगला मानमरातब ठेवल्या जात असे. शिवकाळात कमाविसदाराच्या तैनातीस चोपदार, दिवटया व अफदागिऱ्या असे. तसेच राहावयाची घरे जरूर त्या ठिकाणी सरकारातून बांधून मिळत असे.[२६] पेशवेकाळातही कमाविसदाराला आकर्षक वेतन मिळत असे. शिवाय पालखी, मशालजी व अब्दागीर यांच्याकरिता वेगळा भत्ता मिळे.[२७] साधारणतः कमाविसदारास त्यांच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशातील उत्पन्नाच्या ४ टक्के मेहनताना मिळे,[२८] तर त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या काही महसूल अधिकाऱ्यांना

VOLUME - VI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

सरकारकडून मिळणाऱ्या ठराविक वेतनाव्यतिरिक्त लोकांकडून हकलाजिम्याची प्राप्तीही होत असे. ज्यांना अशी हकलाजिम्याची प्राप्ती मिळत नसे, त्यांना अर्थातच ठराविक वेतन घेण्याची मुभा असे.[१९]

त्रिंबक हरी कमाविसदार, सरकार हंडे महाल मजकूरची नेमणूक दिमतखासा सालीना रुपये १००० (१७४०-४१) परंतु परगणे भूपाल निसबत रामचंद्र बल्लाळ कमाविसदार यास ७००० वेतन (सालीना १७४३-४४) रसद पावणे दोन लाख रु. दरसदे ४ रु. प्रमाणे) परंतु हा नियम सर्वत्र एकसारखा दिसत नाही. कसबा पुणतांब्याच्या कमाविसदाराच्या सनदेच्या तळटीपेत उदधृत केल्याप्रमाणे त्यांच्या नेमणूक पत्रात स्पष्ट करार आहे की, दरसाल २०,००० रु. सरकारात जमा करून जाब घेत जाणे. पूर्वीच्या नियमाप्रमाणे त्याचा पगार सालीना ८०० रु. असावयास हवा होता, परंतु त्या अधिकाऱ्याला २०० हून अधिक मिळत नसत. (रसद दरसाल २०,००० रु. प्रमाणे करार केली असे. दरसाल २०,००० रु. सरकारात जमा करून जाब घेत जाणे. शिबंदी व महाल मजकूराची नेमणूक, रु. २०० -कमाविसदार)[२०]

वरील उदाहरणांवरून कमाविसदाराच्या ताब्यात लहान -मोठा विभाग असला, तरी त्यास एकूण उत्पन्नाच्या ४ टक्के प्रमाणे मेहनताना मिळायला हवा होता, परंतु प्रत्यक्षात तसे घडत नसल्याचे दिसते. याबाबती डॉ. सेन म्हणतात की, "सर्व कमाविसदारांचे वेतन हे सारखे नसे. त्यांच्या अमंलाखालील महालाच्या महत्त्वाप्रमाणे ते बदलत होते."[२१] कमाविसदारास देण्यात येणाऱ्या वेतनामध्येच त्याचा पालखी, मशालजी व अब्दागीर यांचा भत्ता समाविष्ट असे. तसेच कमाविसदारास देण्यात येणारे वेतन हे अकरा महिन्याचे असल्याने तत्काळात लष्करी, किल्ले व इतर विभागात अवलंबविण्यात येणारी प्रथा कमाविसदारासही लागू असल्याचे दिसते. आजही काही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना वेतनाव्यतिरिक्त इतर सुविधांसाठी विशेष भत्ता दिला जातो. हिच पध्दत मराठाकाळात कमाविसदारास लागू होत असल्याने तत्कालीन प्रशासनातील कमाविसदाराचा दर्जा स्पष्ट होण्यास मदत होते.

निष्कर्ष

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना शिवपूर्वकाळातील वतनदारांचे महसूली अधिकार काढून घेऊन त्यांच्याजागी कमाविसदार या नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. कमाविसदार हा एक अधिकारी नसून खेडयापासून महालापर्यंत त्यांची एक श्रेणी तयार झाली होती. कमाविसदारांच्या उदयाने जनतेवरील वतनदाराचा अन्याय कमी होऊन प्रशासन स्थिर होण्यास मदत झाली. शिवकाळात कमाविसदार हा महसूल वसुलीसाठी प्रसिध्द होता, मात्र पेशवेकाळात कमाविसदाराकडे आर्थिक अधिकाराव्यतिरिक्त परगण्यातील राजकीय, न्यायालयीन अधिकार आले. तसेच कमाविसी प्राप्त कमाविसदार एक लष्करी अधिकारी म्हणून साम्राज्यविस्तारातही हातभार लावू लागला. त्यामुळे मराठा राज्याच्यादृष्टीने कमाविसदार हा महत्त्वाचा अधिकारी असल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची

१) चिटणीस कृ. ना. मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, पुणे, १९७६, पृ. १७९
२) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, २००४, पृ. ३५
३) कुलकर्णी विजया, (अनु.) मराठयांची प्रशासन व्यवस्था, म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, २००१, पृ. १२३
४) कुलकर्णी अ. रा. (संपा.), रामचंद्र अमात्यकृत आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ. ५९
५) कुलकर्णी विजया, (अनु.) पूर्वोक्त, पृ. १२३
६) रानडे म. गो. (भाषां.), मराठी सत्तेचा उत्कर्ष, वरदा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १०१
७) केळूसकर वा. कृ. छत्रपती शिवाजी महाराज, वरदा प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. ४३१
८) खोबरेलकर वि. गो. महाराष्ट्राचा इतिहास- मराठा कालखंड (भाग-१) शिवकाळ (१६३०-१७०७), म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, २००६, पृ. ४८०
९) जोशी श.ना., अर्वाचिन महाराष्ट्रेतिहासकालांतील राज्यकारभाराचा अभ्यास,(भाग-१) पुणे विद्यापीठ, १९५६, पृ. १४०-१४३

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

१२. खेळाडूंच्या कौशल्यवाढीमध्ये एकाग्रता या घटकाची भुमिका

डॉ. किरण व. बोरकर
श्री. व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देऊळगाव राजा जि. बुलढाणा

गोषवारा (Abstract)

आजच्या युगाला स्पर्धेचे युग म्हणतात. त्यामुळे स्पर्धेत टिकायचे असेल तर स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. विविध क्षेत्राप्रमाणेच क्रीडाक्षेत्राही ही बाब महत्वपूर्ण आहे. त्यासाठी क्रीडा कौशल्य अद्ययावत असणे खेळाडूसाठी महत्वाचे आहे. नविन क्रीडा कौशल्य आत्मसात करण्यासाठी व त्यांचा सराव करण्यासाठी मनाची एकाग्रता असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, शारीरिक शिक्षण शिक्षक यांना एकाग्रता या घटकांची माहिती असणे आवश्यक आहे. या गरजेतून कौशल्यवाढीत एकाग्रता या घटकाची भूमिका काय हे जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. त्यासाठी सर्व प्रथम अध्ययनाची उद्दीष्टे ठरवून घेतली. जेणे करून नेमक्या मुद्यांचे अध्ययन करणे सोपे झाले.

अध्ययनासाठी विविध मानसशास्त्रांच्या पुस्तकांचा संदर्भ गोळा करण्यात आला. विविध वर्तमानपत्रातील या संदर्भातील तज्ञांचे लेख, विविध संकेतस्थळांना भेटी देऊन माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. या माहितीचे अध्ययन केले असता काही ठळक निष्कर्ष असे निघाले–

1. एकाग्रता हा माणसाला उच्चकोटीला नेणारा गुण आहे.
2. क्रीडा कौशल्य, एकाग्रता आणि यश यांचे अतुट नाते आहे.
3. केवळ एकाग्रता ह्या एकाच घटकाच्या आधारे क्रीडा कौशल्य साधने शक्य नसून त्या सोबत सर्जनशिलतेचा विकास होणे आवश्यक आहे.
4. सर्जनशिलता व एकाग्रता या घटकांचा विकास करण्यासाठी योग, श्वासाचे निरीक्षण, प्राणायाम, सुदर्शन क्रिया, ध्यान धारणा या साधनांचा फायदा होतो.
5. किमान 20 मिनिट नियमित वरील साधनांचा सराव केल्याने एकाग्रता व सर्जनशीलता वाढते.
6. योग, प्राणायाम, ध्यान, सुदर्शन क्रिया या सोबतच पौष्टिक आहार घेणे देखील महत्वाचे आहे.

प्रस्तावना

खेळाडूंच्या कौशल्यामध्ये वाढ करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शक विविध घटकांचा विचार करीत असतात. व्यायामामध्ये, सरावामध्ये, त्यांच्या सवयींमध्ये कशाप्रकारे बदल केल्यास त्यांचे अनुकूल परीणाम आपणास मिळतील या विषयी सतत अभ्यास करत असतात.

क्रिकेट सम्राट या मासिकामध्ये एका टेस्ट इंडियाच्या खेळाडूची मुलाखत वाचली होती. त्यात त्याने असे सांगितले की, तो जेव्हा सामना खेळण्यास किंवा फलंदाजी करण्यास मैदानावर उतरत होता त्या अगोदर तो अंतर्मनात ध्यान करत होता. त्याच्यामध्ये असे केल्याने त्याच्या खेळामध्ये कमालीची सुधारणा होत होती. महाभारतामध्ये अर्जुनाने

Asstt Professor
Shri Vyankatesh Arts,

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

[illegible] आपण पाहतो. हि जादू [illegible] काही नाही. ही त्यांनी साधलेली एकाग्रता, [illegible] या सर्व घटकांचा तो परिणाम आहे. म्हणजेच क्रीडा कौशल्याचा विकास करण्याचा [illegible] क्रीडा कौशल्याचे ज्ञान व मानसिक सुदृढता या घटकांचा विचार एक क्रीडा मार्गदर्शक म्हणून आपणास करावा लागेल.

मानसिक सुदृढतेच्या घटकांमध्ये मनाची स्थिरता, मनावर नियंत्रण, मनाची एकाग्रता व सृजनशीलता या घटकांचा समावेश होतो. यापैकी मनाची एकाग्रता ही मानसाला कोणतीही कृती करण्यात महत्वाची भूमिका बजावत असते. म्हणून मनाची एकाग्रता म्हणजे काय? एकाग्रता साधण्यास कोणते उपाय केले जावे या विषयी अध्ययन करणे क्रीडा मार्गदर्शकास महत्वपूर्ण ठरते. तसेच एक क्रीडा मार्गदर्शक म्हणून एकाग्रता वाढविण्याच्या साधनांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. त्यासाठी एकाग्रता वाढविण्यासाठी कोणते व्यायाम केले पाहिजे, कोणकोणते साधने उपयुक्त ठरू शकतात या विषयावर संशोधन करणे महत्वपूर्ण ठरते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

1. क्रीडा कौशल्य व एकाग्रता याचा संबंध जाणून घेणे.
2. कौशल्यवाढीसाठी एकाग्रता या घटकाचे अध्ययन करणे.
3. क्रीडा कौशल्यासाठी एकाग्रतेचे फायदे जाणून घेणे.
4. एकाग्रता वाढीसाठी साधनांचे अध्ययन करणे.
5. एकाग्रता वाढविण्यासाठी योगशास्त्रातील साधनांचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितके

1. क्रीडा कौशल्य व एकाग्रता याचा अगदी जवळचा संबंध आहे.
2. क्रीडा कौशल्यवाढीत एकाग्रता महत्वपूर्ण भूमिका बजावते.
3. एकाग्रता ही प्रत्येक क्षेत्रामध्ये महत्वाचा घटक आहे.
4. एकाग्रतावाढीसाठी योगामधील ध्यान, धारणा या साधनांचा फायदा होतो.

एकाग्रतेचा अर्थ व परिभाषा

1. **स्वामी विवेकानंद** : आपल्याला आवश्यक त्या गोष्टीकडे संपूर्ण लक्ष देण्याची व त्यावेळी अन्य गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याची क्षमता म्हणजे एकाग्रता होय.
2. आपली भावनीक आणि बौद्धिक शक्ती एकवटून ती ईच्छित कालावधीत ठरविलेल्या ध्येयांवर उद्दीष्टांवर स्थिर ठेवण्याची क्षमता म्हणजे एकाग्रता होय.

मनशांती 16 सोप्या पध्दती

स्वामी विवेकानंद यांनी 'मनशांती 16 सोप्या पध्दती' या पुस्तकामध्ये वरील आणि एकाग्रता यांचा संबंध विशद करण्याचा प्रयत्न केला.

मानसाची अनेक गुण वैशिष्टे आहेत. त्यापैकी त्याला उत्कर्षाला नेणारा एक गुण म्हणजे एकाग्रता. एकाग्रतेमुळे आपल्या मनाची खुप शक्ती वाढते. ही आपणास अनेक उपयोगी पडते. एकाग्रतेमुळे आपली कार्यक्षमताही

Asstt Professor
Shri Vyankatesh Arts

Shri Vyankatesh College
Deulgaon Raja

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

वाढते आणि यश लवकर प्राप्त होते. यश आणि एकाग्रता यांच अतूट नाते आहे. कला, क्रीडा, शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग-व्यापार, राजकारण, युद्ध, अध्यात्म इ. सर्वच छोट्या-मोठ्या क्षेत्रामध्ये यशासाठी एकाग्रता आवश्यक आहे. एकाग्रतेचे महत्त्व हे असं सर्वव्यापी आहे. या पुस्तकामध्ये लेखकाने एकाग्रता आणि ध्यान यांच्यामध्ये फरक दाखवला आहे आणि तो म्हणजे हेतूचा आहे. म्हणजेच एकाग्रता ही बाह्य यशासाठी असते जसे दैनंदिन व्यवहारामध्ये यश मिळविण्यासाठी उपयुक्त अशी प्रक्रिया आहे. तर ध्यानही आपल्या अंतर्मनाच्या शोधाची, तसेच शुद्धीकरीहि प्रक्रिया आहे. अशा या दोन्हींचा समन्वय साधून या पुस्तकामध्ये लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच एकाग्रता आणि मन शांती व शुद्धिसाठी 16 सोप्या पद्धती सांगितल्या आहेत. यामध्ये स्थिर माध्यम पद्धती कल्पना माध्यम पद्धत, परिणाम ज्ञान पद्धत, ज्ञानप्रयोग-विज्ञान पद्धत अशा टप्प्याटप्प्याने साधनेच्या पद्धतीचे मार्गदर्शन केले आहे. उदा. पहिली पद्धत 'तत्क्षणस्थ स्थिरता' पद्धत मनाच्या अस्थिरतेला स्थिरतेकडे नेण्यासाठी अतिशय उपयुक्त अशी ही साधना पद्धत व्यापारी वर्गाबरोबर इतरांनाही उपयुक्त आहे. तर समजण्यात शेवटची म्हणजे 16 वी पद्धत या पद्धतीत धकाधकीच्या आयुष्यातील धडपडण्या ऐवजी स्तब्धतेत सर्व देशाचे सुख आहे त्यामुळे शांती बाळगण्याची सूचना आहे. हिचा उपयोग सर्वच कामात होईल. लेखकांच्यामते प्रत्येक येथील सुचवलेल्या प्रकारापैकी कोणता प्रकार तुमच्या व्यक्तिमत्वाला अधिक उपयुक्त वाटतो, याकडे लक्ष ठेवायचे आहे. कोणता तरी एक साधना प्रकार तुम्हाला शांती आणि समाधान देईल आणि जीवनात नवे परिवर्तन करेल. यामुळे आपला फायदा, मग तो भौतिक असो की आधिभौतिक, झाल्याशिवाय राहणार नाही.

विजयाचे मानसशास्त्र

भिमराज बाम हे क्रीडा मानसशास्त्राचे आणि भारतीय योगशास्त्राचे अभ्यासक आहेत. भिमराज बाम यांनी खेळाडू प्रमाणेच सर्वच क्षेत्रामध्ये कर्तृत्व गाजविण्यासाठी प्रभावी तंत्रे या पुस्तकाच्या माध्यमातून मांडली आहेत. या पुस्तकामध्ये त्यांनी उत्तमाची आराधना, ध्येयाकडे वाटचाल, एकाग्रता आणि अवधान, विश्रांती, तणाव मुक्ती, संघभावना आणि नेतृत्व, ताण, चिंता आणि प्रेरणा ह्या महत्त्वपूर्ण विषयावर प्रकाश टाकला आहे. भाग दोन मध्ये त्यांनी कौशल्या आणि कामगिरी यात सुधारणा करण्याची तंत्रे सांगितली. तर भाग तीन मध्ये विशिष्ट खेळांसाठी तंत्रांचा वापर कसा करावा हे सांगितले आहे.

डॉ. यश वेलणकर

डॉ. वेलणकर यांनी लोकमत न्युज नेटवर्कमध्ये, हेल्थ या कॉलम अंतर्गत 'माईंड फुलनेस मेडिटेशन करा एकाग्रता आणि सर्जनशिलता वाढेल' हा लेख 9 सप्टेंबर 2017 रोजी प्रसिद्ध केला. यामध्ये लेखकाने एकाग्रतेचा अर्थ सांगताना जे काही आपण पाहत, एकत असतो त्यावेळी मनात अन्य कोणतेही विचार येऊ न देता त्याकृतीवर पुर्ण मन केंद्रीत करणे म्हणजे एकाग्र होणे असे म्हटले आहे. लेखकाच्या मते कोणतेही लक्ष टिपायचे असेल एकाग्रता खुप महत्त्वाची असते. महाभारतातील अर्जुन थोर धनुर्धर झाला कारण त्याने नेम धरला तर त्याला फक्त पक्षाचा डोळाच दिसत असे. अशी एकाग्रता सरावाने येते. असा मेंदूला दिलेला सराव म्हणजे एकाग्रता ध्यान, फोकस्ड मेडिटेशन होय. आवाज, दृश्य, श्वासाचा स्पर्श किंवा एक विचार असे कोणतेही एक अवलंब ठरवायचे आणि त्यावर दीर्घकाळ मन एकाग्र करायचे म्हणजे ते अवलंबन सोडून मनात अनेक विचार आले तरी त्याकडे दुर्लक्ष करुन मन पुन्हा पुन्हा

Shri Vyankatesh College Deulgaon Raja

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

[illegible] ... त्यामुळे एकाग्रता वाढते. [illegible] ... विलंब न करता हे व्यायाम करायला हवा [illegible] ... मिनिट [illegible]

[illegible] ... एकाग्रतेच्या [illegible] ... मेडिटेशन केले तर एकाग्रता वाढते [illegible] ... सर्जनशीलतेसाठी काही तरी नवीन सुचणे आवश्यक असते. [illegible] ... आवश्यक असते. [illegible] ... माईंडफुलनेस मेडिटेशन म्हणतात. [illegible] ... दुसरा प्रकार आहे. [illegible] ... शरीरात, मनात आणि परिसरात जे काही घडते आहे ते जाणवत राहणे. [illegible] ... पण त्यामध्ये गुंतून ही जात नाही. आपण विचारांकडे [illegible] ... कौशल्य आहे. आणि हे सरावाने वाढविता येते. [illegible] ... एक मेंदूचा व्यायाम आहे. लहान मुलांना हे दोन्ही व्यायाम शिकविले आणि त्यांना त्याची गोडी निर्माण झाली की, त्यांची एकाग्रता आणि सर्जनशीलता दोन्ही वाढतात. (माईंडफुलनेस मेडिटेशन करा, एकाग्रता आणि सर्जनशीलता वाढेल- डॉ. [illegible], हेल्थ, लोकमत न्यूज नेटवर्क-, 9 सप्टेंबर 2017)

- **द आर्ट ऑफ लिव्हिंग : (एकाग्रता वाढविण्याच्या 5 पद्धती)** आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर यांच्या मते आपण कोणत्याही क्षेत्रातील नागरिक खेळाडू, कलाकार, नोकरदार किंवा व्यावसायिक असलात तरी सुद्धा तुमची कामगिरी व नवीन गोष्ट शिकण्याची तुमची क्षमता हे दोन्ही तुमच्या एकाग्रतेच्या क्षमतेवर अवलंबून असते. एकाग्रता नसेल तर [illegible] ... मन एकाग्र न होण्याचे अनेक कारणे आहेत. [illegible] ... हे मुख्य कारणे आहेत. [illegible] ... एकाग्रता [illegible] ... मनाला नैसर्गिकरित्या अधिक विश्रांत करणे हे अधिक सुरक्षित, अधिक आरोग्यदायक होईल असे लेखकाला वाटते. ध्यानाची साधी तंत्रे आणि मूलभूत [illegible] ... मदत होते. द आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्यामते ध्यान म्हणजे [illegible] ... आणि [illegible] व मनाची एकाग्रता हे नियमित ध्यानाच्या सरावाचे परिणाम आहेत. श्री श्री रविशंकर यांनी ध्यान करताना श्वासाचे निरीक्षण करणे, प्राणायाम, सुदर्शन क्रिया व एकाग्रतेचे [illegible] ... शिफारस केली आहे. त्याचबरोबर त्यांनी स्वतःच्या दिवसाचे निरीक्षण करण्याचे सुचविले आहे. स्वतःच्या दिवसभराच्या [illegible] ... निरीक्षण करावे [illegible] ... सकारात्मक किती गोष्टी असतो, नकारात्मक किती गोष्टी असतो यावर आपले मानसिक स्वास्थ्य अवलंबून असते. अधिक सकारात्मक गोष्टींचा अनुकूल परिणाम आपल्या मनावर होतो. [illegible] ... केवळ 20 मिनिटे [illegible] ... केल्याने मेंदूची एकाग्रता आणि ती टिकवून ठेवण्याची क्षमता या दोन्हीला [illegible]



VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

त्यांनी सांख्यिकी केला आहे. मेंदू निरोगी राहण्यासाठी त्यांनी आहारावर सुद्धा लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्यामते पोषक आहाराने बुद्धी स्मरणशक्ती आणि बुद्धी तर तीव्र होतेच पण शिवाय मूड सुद्धा चांगला होतो. ते मांसाहारापासून लांब राहण्याचा सल्ला देतात.

संशोधनाचे निष्कर्ष

- एकाग्रता हा माणसाला उच्चकोटीला नेणारा एक गुण आहे.
- उत्तम कौशल्याच्या बळावर यश प्राप्त होते, म्हणून कौशल्य, एकाग्रता आणि यश यांचे अतूट नाते आहे.
- एकाग्रतेचे महत्त्व हे सर्वव्यापी आहे. क्रीडाक्षेत्रासह अनेक क्षेत्रात एकाग्रतेला महत्त्व आहे.
- **केवळ एकाग्रतेमुळेच कौशल्याची वाढ होत नाही तर त्याच्या सोबतीला सर्जनशिलता वाढणे सुद्धा आवश्यक आहे.**
- **फोकस्ड मेडिटेशनमुळे केवळ एकाग्रता वाढते, तर माईंड फुलनेस मेडिटेशन केल्याने एकाग्रता व सर्जनशिलता वाढते.**
- साकारणा व मनाची एकाग्रता हे नियमित ध्यानाच्या सरावाचे परिणाम आहेत.
- एकाग्रता वाढीसाठी श्वासाचे निरीक्षण, प्राणायाम, सुदर्शन क्रिया व एकाग्रतेचे प्राणायाम (ध्यान, धारणा) या साधनांचा उपयोग फायदेशीर ठरतो.
- नियमित 20 मिनिटांच्या योगाने मेंदूची एकाग्रता आणि ती टिकून ठेवण्याची क्षमता या दोन्हीला उत्तेजन मिळते.
- योग्य व पौष्टिक आहाराने स्मरणशक्ती आणि बुद्धि तीव्र होते. शिवाय मूड सुद्धा चांगला राहतो.

सारांश

खेळाचा कोणताही प्रकार असो जिंकण्यासाठी खेळाडूला क्रीडा कौशल्य आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे क्रीडा कौशल्य आत्मसात करण्यासाठी मनाची स्थिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. मनाची एकाग्रता होत असेल तर क्रीडा कौशल्य लवकर आत्मसात होते. परंतु उपरोक्त अभ्यासनामध्ये असे आढळून येते की, केवळ एकाग्रतेने नविन कौशल्य आत्मसात होणार नाही तर त्याच्या जोडीला सर्जनशिलतेचा सुद्धा विकास होणे गरजेचे आहे. थोडक्यात, क्रीडा कौशल्य व एकाग्रता यांच अतूट असा नातं आहे. एकाग्रता वाढीसाठी प्राणायाम, ध्यान, धारणा, सुदर्शन क्रिया इ. साधनांचा उपयोग होतो म्हणून खेळाडू, क्रीडा मार्गदर्शकांना सर्वप्रथम मनाची एकाग्रता व सर्जनशीलता वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजे. तरच खेळाडूच्या कामगिरीमध्ये अनुकूल बदल पहावयास मिळतील.

संदर्भ

इंग्रजी संदर्भ

- Alderman, W.(1974), ' Psychological Behavior in Sports,' New York, Harper
- Bull, S.J.(2000), 'Sports Psychology- A self-help guide', Cordwood press Ltd.,Marlborough.

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

मराठी संदर्भ

- आयंगर, बी. के. एस. 2002, 'योगदीपिका' हैद्राबाद, ओरिएन्ट लॉगमन प्रायव्हेट लिमिटेड
- [illegible] 2009, '[illegible]'. मुंबई. [illegible]
- पाटील बापूराव 1995. '[illegible]' औरंगाबाद. [illegible] प्रकाशन

Miscellaneous

- http://www.manshakti.org/
- www.mentalskills.co.uk
- www.sipeedu.com
- http://www.artofliving.org/in-mr/meditation-for-you
- w.lokmat.com>health

Asstt.Professor
Shri Vyankatesh Arts,Comm & Science College Deulgaon Raja
Dist. Buldana,Pin-443204

Shri Vyankatesh College Deulgaon Raja